विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०२० |
| वर्ष | : | चोप्पन्नावे |
| अंक | : | चौथा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

## गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०२०

## गणपत्रिका क्रमांक : २०२

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
**गुंडोपंत हरिभक्त**

**वार्षिक ऐच्छिक देणगी**
**किमान ७५ रुपये**

**दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.**
**भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $**

# सद्धर्म
## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

**वर्ष : चोप्पन्नावे अंक : चौथा पौष/माघ १९४१ जानेवारी २०२०**

## *संपादकीय*

### विनोबा भावे : सद्धर्माचा उद्गाता

सप्टेंबर २०१९ पासून विनोबा भावेंचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष सुरु आहे. विनोबांना केवळ 'भूदान' चळवळीशी जोडून व गांधीजींचे पहिले वैयक्तिक सत्याग्रही म्हणूनच लौकिक प्राप्त झाला नसून धर्माची चिकित्सा करणारा अवलिया विद्वान म्हणून देखील त्यांचा लौकीक आहे. ११ सप्टेंबर १८९५ ते १५ नोव्हेंबर १९८२ पर्यंत म्हणजे ८७ वर्षे विनोबा या पृथ्वीवर देहधारण करून होते. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुकयातील गागोदे या गावी विनोबांचा जन्म झाला. आजोबा व आईकडून धर्मपरायणता त्यांना लाभली.

वाई येथील प्राज्ञ पाठशाळेतील स्वामी केवलानंद सरस्वती यांच्यापाशी विनोबांनी उपनिषदे, बृह्मसूत्र शांकरभाष्य पातंजलसूत्रे इ. विषयांचे अध्ययन केले. हे अध्ययन पुढे त्यांना भूदान चळवळ, स्वदेशी, सविनय कायदेभंग इत्यादी आंदोलनात कामी आले. गांधीजींशी त्यांचा विशेष जिव्हाळा होता. २० ऑक्टोबर १९४० रोजी 'हरिजन' या साप्ताहिकात गांधीजींनी विनोबांची ओळख जगाला करून दिली.

१९३२ सालच्या सविनय कायदेभंगाच्या सामुदायिक आंदोलनात विनोबांनी भाग घेतला व त्यांना अटक झाली. धुळ्याच्या कारागृहात ही शिक्षा भोगताना त्यांची सुप्रसिद्ध गीताप्रवचने जन्माला आली. ही प्रवचने साने गुरुजींसारख्या विद्वानाने शब्दबद्ध केली व मराठीच्या साहित्यात मोलाची भर घातली.

विनोबांनी या प्रवचनात गीता ही साक्षात भगवंताची उक्ती होय असा दृष्टीकोन मांडला. मोहनिरास

(पृष्ठ क्र. ३० वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१. इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने कार्यालय बंद आहे. कृपया टपाल व मनीऑर्डर्स पाठवू नये.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.) दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता).५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

*श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५/९०८२९९०४३१ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), कामे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

***अनुक्रमणिका***


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| कालभैरवाष्टकम्। | ५ |
| ''पूर्णावतार भगवान श्रीकृष्णांची युद्धनीति'' | ६ |
| ज्ञान आणि ज्ञान व्यवस्थापन | १० |
| गीतकृष्णायन-भाग ६-युगांत | १३ |
| 'प्रपंच' | १४ |
| 'एक जीवन एक ध्येय' | १८ |
| सुभाषित कथा | २३ |
| ''अर्धनारी नटेश्वर देवाधिदेव महादेव स्वरुप वर्णन'' | २५ |



**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | |
|---|---|
| १) सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) उपासना | रु. ४० |
| ११) श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) गंगालहरी | रु. २५ |
| १४) गणपत्यथर्वशीर्षातील व्याकरण | रु. ३० |
| १५) सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |


- या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
- या त्रैमासिकातील मजकूर संपादकांच्या परवानगीशिवाय कोणीही कुठेही छापू नये.
- मनीऑर्डरने पैसे पाठविताना मनीऑर्डर फॉर्मवर आपला मोबाईल क्रमांक लिहावा म्हणजे संपर्क करणे सोपे पडते.
- सद्धर्माच्या लेखकांनी त्यांचा लेख इतर ठिकाणी पाठविणे असल्यास तो सद्धर्माच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे असा उल्लेख करावा. **- संपादक**

परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील व दी. का. देणगीदारांची नावे अपरिहार्य कारणामुळे पुढील अंकात देण्यात येईल. **– संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ४१ वा

**उद्योगः पुरुषलक्षणम्।** [४२८]

सततोद्योग करीत राहणे हाच खरा पुरुषार्थ आहे.

**अश्वस्य लक्षणं वेगो, मत्तो मातङ्गलक्षणम्।**
**चातुर्यलक्षणं नार्याः, उद्योगः पुरुषलक्षणम्।।**

मातङ्ग – हत्ती.

**उद्योगे नास्ति दारिद्रयम्।** [४२९]

उद्योग करीत राहिल्यास दारिद्र्याचे नावही असणार नाही.

दुसरी ओळ – जपतो नास्ति पातकम्। तिसरी – मौनिनः कलहं नास्ति। चौथी – न भयंचास्ति जाग्रतः।। मौनी – व्यापक अर्थ – कोणाच्याही अद्यात किंवा मध्यात न पडणारा. जाग्रतः – सतत जागरुक राहणारा.

**उपानद्‌गूढपादस्य ननु चर्मावृतैरिव भूः।** [४३०]

ज्याने पायात पादत्राण घातले आहे त्याच्या दृष्टीने जणू सर्व पृथ्वीच चामड्याने झाकलेली आहे.

पहिली ओळ : सर्वाः सम्पत्तयस्तस्य संतुष्टं यस्य मनः।।

ज्याचे मन संतुष्ट आहे जगातली सर्व संपत्ती त्याचीच आहे.

उत्साहसम्पन्न मदीर्घसूत्रम्[४३१]

जो उत्साही आहे व कालविलंब न करणारा आहे.

**[३]क्रियाविधिज्ञं, [४]व्यसनेष्वसक्तम्**
**[५]शूरं, [६]कृतज्ञं, [७]दृढसौहृदं चं।**
**लक्ष्मीः स्वयं मार्गति वासहेतोः।।**

यशस्वी होण्यासाठी श्लोकात ७ मार्ग सांगितले आहेत.

३–आपले काम उत्तम प्रकारे जाणारा. ४– व्यसनाचा लवलेशही नसणारा ७–घनिष्ट मैत्री ठेवणारा

**अल्पविद्यो महागर्वी।** [४३२]

उथळ पाण्याला खळखळाट फार. ह्या म्हणीचा आपल्याला पदोपदी अनुभव येतो.

**किं मर्दितोऽपि कस्तुर्या लशुनो यानि सौरभम्?** [४३३]

लसूणाला कस्तुरीने मर्दन केले तरी त्याला कस्तुरीचा सुगंध लागून मूळ वास जाईल काय?

कडुकार्ले तुपात तळले साखरेत घोळले तरी ते कडू ते कडूच. क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड – ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८–२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

**कालभैरवाष्टकम्‌ (श्लोक चौथा)** **दि. दा. औटी**
**(शब्दार्थ, अन्वय, समास, अनुवाद आणि वृत्त)**

**भुक्तिमुक्तिदायकं प्रशस्तचारुविग्रहं**
**भक्तवत्सलं स्थितं समस्तलोकविग्रहम्।**

**भीमविक्रमं प्रभु विचित्रताण्डवंप्रियं**
**काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।४।।**

पाद १ ला : भुक्ति (स्त्री) खाणे, अन्न. मुक्ति (स्त्री) सुटका भुक्ति च मुक्ति च भुक्तिमुक्ती इतरेतरद्वंद्व, तयोः दायकः भुक्तिमुक्तिदायकः तम् भुक्तिमुक्तिदायकम्। विग्रह (पुं.) देह, प्रशस्त (वि.) श्रेष्ठ, चारु (वि.) सुंदर. प्रशस्तः चारुःच विग्रहः यस्य सः। इतरेतर द्वन्द्व गर्भ तद्गुणसंविज्ञान बहु.। प्रशस्तचारु विग्रहः तम्।

पाद २ रा – भक्तवत्सलम् – भक्तेषु वत्सलः भक्तवत्सलः स.त. तम्। समस्तलोकविग्रहम् – समस्तः लोकः समस्त लोकः क.धा.। तेषां विग्रहः समस्तलोकविग्रहः ष.त.। तम्। स्थितम् (वि.) असलेला

टीप : विग्रहचा अर्थ येथे 'वृद्धी' असा आहे.

पाद ३ रा : विनिक्वणन् – वि+नि+क्वण् १ प.प.

कर्तरि व.का.वा.धा.सा.वि. (किङ्किमणींचे – विशेषण). मनोज्ञ – मनाला आनंद देणाऱ्या.

हेमकिङ्किणी – हेम्नः किङ्किण्यः ष.त. सोन्याच्या घागऱ्या. लसत् – लस् १ प.प. कर्तरि व.का.वा.धा.सा.वि. चकाकणाऱ्या. कटिम् (स्त्री.) कंबर द्वितीया० विनिक्वणद्भिः मनोज्ञाभिः हेम किङ्किणीभिः लसद्भिः यस्य कटिः ( कटी वा) तद्गुण-सविज्ञानबहु. विनिक्वणन्मनोज्ञहेमकिङ्किणि-लसन्कटिः तम्। विनिक्वणमनोज्ञहेमकिङ्किणी-लसत्कटिम्।

पाद ४ था – ध्रुवपद आहे व याचे विवेचन यापूर्वीच केले आहे.

टीप– कटि किंवा कटी – कंबर.

भावार्थ : भुक्ती आणि मुक्ती देणाऱ्या, ज्याचा देह प्रशस्त आणि सुंदर आहे अशाला, भक्तांशी प्रेमळ असणाऱ्याला, सर्व लोकांची वृद्धी करीत असलेल्याला, खुळखुळ वाजण्यामुळे मनाला आनंद देणाऱ्या व चकाकणाऱ्या सोन्याच्या घागऱ्या ज्याने कंबरेवर परिधान केल्या आहेत अशा काशीक्षेत्राचा मालकाला काळभैरवाला मी भजतो.

क्रमशः

**दि. दा. औटी**

●●●



(उर्वरित लेख मागील अंकापासून पुढे...)

यानंतर दुर्योधनाचा आधार होता महारथी कर्ण. कर्णाने इंद्राकडून वासवी शक्ती प्राप्त केली होती. कवचकुंडलांचे दानबदल्यात व ती त्याला फक्त एकच वेळ वापरता येणार होती. ती त्याने केवळ अर्जुनवधासाठीच राखून ठेवली होती. एकदा का ती शक्ति गेली की तो केवळ महारथी योद्धाच रहाणार होता. तरीपण परशुरामांनी दिलेले धनुष्य त्याचे हातात असेपर्यंत जगातला कोणताही धनुर्धर त्याला मारू शकणार नाही हा परशुरामांचा वरही त्याला होता. आता दुर्योधनाने कर्णाला सेनापती केले होते.

या सर्वांची पूर्ण कल्पना असल्याने श्रीकृष्णांनी वेगळीच युद्धनीति आखली. कर्णाला दोन शाप होते. एक ऐनवेळी ब्रह्मशस्त्र विसरण्याचा व भूमीने रथचक्र गिळण्याचा दुसरा. हे ही कृष्णभगवानांना ज्ञात होते. प्रथम कर्णास वासवीशक्तीहीन करणे अत्यावश्यक होते. शिवाय त्याचे मनोधैर्य खचविण्याचे कार्य त्याचे जन्मरहस्य सांगून करण्याचे व युद्धात त्याला परशुराम धनुष्य खाली ठेवण्यास लावून त्याचा वध करण्याचे अशी ही युद्धनीति श्रीकृष्णांनी आखली तीन स्तरात. प्रथम वासवीशक्ती हीन करणे, दुसरे त्याचे मानसिक खच्चीकरणे व तिसरे परशुराम धनुत्याग करण्यास लावून वध.

दुर्योधनाचा अलायुध नावाचा असूर / दैत्य मित्र होता व तो त्याचे मदतीस आला तेव्हा दुर्योधनाने रात्रीही युद्ध सुरूच ठेवण्याचे जाहीर केले. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे युद्ध रोज सूर्यास्तास संपत असे. अलायुध हा असूर मदतीस आल्याने हा शिरस्ता मोडीत काढून युद्ध रात्रीसही सुरू ठेवण्याचे त्यामुळे ठरले व तशी घोषणा केली. असूर मायावी विद्येत प्रवीण असतात व रात्री त्यांचे सामर्थ्य कित्येक पट वाढते. त्यामुळे त्यांचा सामना करणे शक्य होत नाही. श्रीकृष्ण हे जाणून होते व या असुराशी लढा देवून त्याचा नाश करायला तेवढीच मायावी शक्ती असलेला असूर / राक्षस हवा. त्यावेळी त्यांनी भीमपुत्र घटोत्कचास बोलावण्यास भीमास सांगितले त्याप्रमाणे भीमाने साद घालताच घटोत्कच तेथे प्रकट झाला. अलायुध व घटोत्कचाचे घनघोर मायावी युद्धात घटोत्कचाने अलायुधाचा वध केला व त्याच्या महापराक्रमाने कौरव सेनेचा महाविनाश होवून ती पांडव सेने एवढी झाली व हा संहार असाच सुरु राहिला तर कौरवांचा विनाश पूर्ण होणार असे दिसू लागले. कौरवांच्या रथी महारथींनाही तो आटपेना. दुर्योधनासही त्याने रथासकट उचलले पण पिता भीमाची त्या दुर्योधनास ठार मारण्याची प्रतिज्ञा आहे हे जाणून त्यास सोडले. दुर्योधन हतबल झाला. कर्णाचीही तीच गत झाली तेव्हा दुर्योधनाने कर्णास वासवी शक्ती सोडण्यास सांगितले. पण कर्ण तयार होईना तेव्हा

दुर्योधनाने निकराने ''आम्हीसगळे संपल्यावर तुझे काय?'' हा निर्वाणीचा आदेश दिला तेव्हा कर्णाने वासवी शक्ती सोडून घटोत्कचाचा वध केला. त्यावेळी सर्व पांडव दुःखी झाले व श्रीकृष्णांनी आनंद व्यक्त केला. कारण अर्जुनाचा धोका टळला व कर्णाजवळचे एकमेव राखीव अस्त्र नष्ट झाले व त्याचे सामर्थ्य इतर महारथींएवढेच झाले. ही पहिली पायरी यशस्वी झाली. कर्ण सामान्य महारथी झाला.

आता दुसरी खेळी त्याचे मनोधैर्य खच्चीकरणाची होती. त्यासाठी श्रीकृष्णांनी कुंतीला कर्णाकडे पाठविले त्याचे जन्मरहस्य सांगण्यास. कुंतीने ते सांगितल्यावरही कर्ण दुर्योधनाचा पक्ष सोडण्यास तयार झाला नाही फक्त त्याने अर्जुन सोडून तुझ्या चार मुलांचा मी वध करणार नाही. मी व अर्जुन यांचे युद्धात कोणीही एक गेला तरी तुझे पाच पुत्र राहतील असे सांगितले. पण मनाने तो आतून खचला गेला तरी त्याने ते उघड दाखवले नाही. ही दुसरी खेळी पण यशस्वी झालीच.

कर्ण व अर्जुनाचे युद्धात खांडववन जाळल्याने संतप्त झालेला 'तक्षक' नाग हा पांडवांचा हाडवैरी बनला होता व त्याला अर्जुनाला दंश करून मारायचे होते. त्या संधीची तो वाट पहात होता. तेव्हा त्याने कर्णाला आपली व्यथा सांगून 'मला तुझ्या बाणावर आरुढ होवू दे व तो शर अर्जुनावर सोड. तेथे मी त्यास दंश करून मारीन व माझा सूड उगवून धन्य होईन. कर्णानेही त्यास संमती दिली कारण शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या न्यायाने व शिवाय तो वासवी शक्ती गमावून बसला होताच. त्याप्रमाणे त्याने तक्षकास बाणारुढ केले व तो शर अर्जुनावर सोडला. महावेगाने येणाऱ्या शरावर तक्षक आरुढ आहे हे श्रीकृष्णांनी तत्काळ ओळखले व हा शर अर्जुनाचे कंठाचा वेध घेणारा आहे लक्षात आले. योग्यक्षणी श्रीकृष्णांनी रथाचे अश्वांवर भार देवून रथ खाली झुकविला व तो शर अर्जुन किरीटास लागला. तक्षकदंश किरीटास झाला व तक्षकविषाने किरीट दग्ध झाला व पडला. अर्जुन वाचला. तक्षक महानिराश होवून परत कर्णाकडे जावून पुन्हा बाणावर आरुढ करण्यास विनवू लागला पण मी एकदाच एक अस्त्र प्रयोग करतो परत नाही त्याच अस्त्राचा प्रयोग करत असे सांगून नकार देताच तक्षक चरफडत निघून गेला पुन्हा संधी मिळेल या आशेने. (पुढे) त्याने परिक्षिताचा बळी घेतला हे वेगळे). शिवाय मला असे वाटते की कर्णाने हे जाणले असावे की कालियामर्दन करणारे श्रीकृष्ण सारथी असतांना हे तक्षकास्त्र कदापी सफल होणार नाहीच शिवाय ते प्रत्यक्ष शेषशायीनारायणावतार आहेत. अधिक संधी तक्षकास देणे म्हणजे आत्मघात होईल कारण वेळप्रसंगी साक्षात गरुड येवून तक्षकास व आपणासही नष्ट करील. तेव्हा ही विषपरीक्षा परत नको म्हणूनच त्याने तक्षकास पुन्हा नाही असे सांगितले. अर्थात हे माझे मत आहे. क्षमस्व.

शत्रूवार कसा विफल करायचा ही युद्धनीति येथे श्रीकृष्णांनी दाखवली आहे. ही

फार चाणाक्ष व उत्तम युद्धनीति प्रतिवार न करताही शत्रूचा वार निःप्रभ करणारी.

या कर्णार्जुन युद्धात श्रीकृष्णाने अर्जुनरथ मुद्दाम अशा भूमीवरून नेला की त्याचे पाठलागात कर्णाचे रथ कमकुवत भूमी खचून रुतले. ही अंतीम खेळी होती त्या त्रिसूत्री योजनेची. कर्ण धनुष्य टाकून रथचक्र काढू लागला. त्याचवेळी श्रीकृष्णांनी अर्जुनास शर सोडून त्याचा वध करण्याचा आदेश दिला व 'हा अधर्म आहे' असे कर्ण उद्‌गारताच त्याच्या सर्व दुष्कृत्याचा पाढा त्वरीत सांगून 'तेव्हा कोठे गेला होता राधासुता तुझा धर्म' हे सांगून निरुत्तर केले व त्याचक्षणी अर्जुनाने नाराच बाण सोडून त्यास मृत्युमुखी नेले. कर्ण रथचक्र काढतांनाच अर्जुनाला शर सोडण्यास आदेश देण्याचे कारण असे की जर तो रथारुढ होवून त्याने परशुराम धनुष्य हाती घेतले असते तर त्याचा पराभव जगातला कोणताही धनुर्धर करू शकणार नाही असा त्याला परशुरामांचा वर होता हे श्रीकृष्णास माहित होते. कर्ण धारातीर्थी पडल्यावर केवळ त्याचाच अग्निसंस्कार भगवान श्रीकृष्णांनी केला कारण त्याचे दानशूरत्व व वीरत्व हे पण येथे लक्षात घ्यावे. 'मरणोतानि वैराणी' ही युद्धनीति येथे दाखवली आहे.

आता दुर्योधनाकडे फक्त अश्वत्थामा हा द्रोणपुत्रच एकमेव व अमरत्व वरदान लाभलेला वीर / महायोद्धा होता. पण त्याआधीच दुर्योधनाने पळ काढला व तो जलाशयात लपून बसला. सर्व कौरव व कौरव सेना नष्ट झालेलीच होती. या दुर्योधनाचे बाबतीत प्रथम एक घटना घडलेली सांगणे उचित. कारण यांतही श्रीकृष्णांचे दूरदर्शीत्व दिसून येते. गांधारी पतिव्रता होती व आयुष्यभर डोळ्यांवर पट्टी बांधून राहिली. तीने दुर्योधनास सांगितले की संपूर्ण वस्त्र त्याग करून सर्वांग उघडा माझ्यापुढे ये व मी पट्टी डोळ्यावरची काढून तुझ्या सर्वांगावर दृष्टी टाकताच तुझे सगळे शरीर व्रज (अभेद्य) होईल. भगवान श्रीकृष्णांनी त्याचा मतिभेद करून आईसमोर विवस्त्र जाणे उचित नव्हे म्हणून कंबरेखाली पुष्पमालायुक्त पुष्पशेला गुढग्यापर्यंत लांब असा घालून जाणेस भाग पडले व नेमका तेवढाच भाग सोडून त्याचे बाकी शरीर वज्र झाले. भीमाची द्रौपदीवस्त्रहरणाचे वेळीची 'दुर्योधनाच्या मांड्या मी गदाप्रहाराने फोडून टाकीन' ही प्रतिज्ञा आता साध्य होणार होती अन्यथा दुर्योधन अजिंक्यच राहिला असता. गांधारी पण समजून चुकली की श्रीकृष्ण नीतिच आहे.

जलाशयात लपलेल्या दुर्योधनास निर्भर्त्सना करून बाहेर येण्यास भाग पाडल्यावर त्याचे व भीमाचे गदायुद्ध सुरू झाले. सर्व पांडव, श्रीकृष्ण, दुर्योधन व भीम यांचे गदायुद्ध पहाण्यास गुरु बलराम हजर होते. भीमाने शर्थ केली पण वज्रांगी दुर्योधन आटोपेना तेव्हा मांडीवर थाप मारून भीमास दुर्योधनाचे जांघेवर गदाप्रहार करण्याचा श्रीकृष्णांनी इशारा दिला (गदायुद्धात कमरेखाली वार करायचा नाही हा नियम असतो). त्याप्रमाणे भीमाने वार करून त्याच्या दोन्ही मांड्या छिन्नविछिन्न केल्या व तो मरणदारी

पडला. हाच भाग झाकलेल्या अवस्थेत दुर्योधन गेल्याने तो वज्रमय झाला नाही. नियमबाह्य युद्ध केल्याने बलराम संतापले व हल घेवून भीमावर चालून जाणार होते. तेव्हा भीमप्रतिज्ञेची आठवण त्यांना श्रीकृष्णाने दिली व हा अधर्म नाही असे सांगितले.

येथे ही युद्धनीति / पवित्रा / डावपेच किती नियोजनबद्ध होता हे लक्षात येते.

याच भीमाचे जेव्हा जरासंधाशी मल्लयुद्ध झाले तेव्हाही श्रीकृष्णांनी काडी उभी चिरुन तिचे दोन भाग परस्परविरोधी दिशेस टाकण्याचा संकेत दिला व त्याप्रमाणे भीमाने जरासंधास उभा चिरुन केलेले दोन भाग परस्परविरोधी दिशेस टाकल्यानेच जरासंध मेला अन्यथा तो अजिंक्यच होता. ही पण कुशल युद्धनीति ज्यात शत्रूचे मृत्युमर्मस्थान ओळखून त्याप्रमाणे युद्ध करणे.

शेवटी राहिला अश्वत्थामा. त्याला मरणासन्न दुर्योधनाने सेनापती केले व त्याने अत्यंत अभद्र नीति वापरून सर्व पांडवपुत्र निद्रेत असतांना मारले. तो अवध्य होता. त्याला पांडवांनी गाठले तेव्हा अर्जुनाबरोबरच युद्धात ब्रह्मास्त्र प्रयोग केला पण ते परत घेता येत नसल्याने त्याने ते अभिमन्यूपत्नी उत्तरेच्या गर्भातील बालकावर टाकले. (पुढे कृष्णाने त्या मृतअर्भकास जीवंत करून पांडव कुलक्षय टाळला). सुदर्शन चक्राने त्याने दुष्ट अश्वत्थाम्याचे शिरावरील मणी काढून त्यास शाप दिला की तो मणी काढल्याने झालेला व्रण जखम अक्षय वाहत राहील, वेदना देत व त्यावर तेल घालण्यासाठी ते मागत तो युगानुयुगे यातना भोगत फिरत राहील कारण तो चिरंजीव होता. हेच चिरंजीवित्व त्याला शाप ठरेल.

शेवटी धृतराष्ट्राने भीमाला भेटण्याची इच्छा व्यक्त करताच त्याचे सामर्थ्य व मनसुबा श्रीकृष्णाचे लक्षात आल्याने ऐनवेळी लोखंडी पुतळा पुढे करून भीमास वाचवले ही पण युद्धनीतिच. शत्रूचे आंतरिक कपट जाणून केलेला प्रतिडाव.

पुढे यादवकुळाचा नाश पाहून मगच त्यांनी अवतारसमाप्ती केली. त्यांचे पार्थिव पांडवांनी शोधून अग्निसंस्कार केले पण त्यातला न जळणारा भाग त्यांनी समुद्रात विसर्जित केला तो आत्मतत्वभाग पुढे जगन्नाथपुरीचे राजास मिळाला व तो तेथील श्रीकृष्णमूर्तीत आहे असे सांगतात कारण ते अमर अक्षय ईशतत्व.

असो. माझ्या अल्पमतीप्रमाणे हा लेख त्यांचेच प्रेरणेने लिहिला आहे.

या युद्धनीतित त्यांनी स्वतः केलेले युद्ध व सल्लागार म्हणून करवलेले युद्ध असे दोन भाग असले तरी युद्धनीतिन / तत्वात फरक पडत नाही. द्वापारयुगात भगवान श्रीकृष्णांनी जी युद्धनीति वापरली त्यात वेळप्रसंगी धर्मतत्वे बाजूस सारली आहेत. काटा काट्यानेच काढावयाचा, अधर्म-धर्म, नीति-अनीति यांच्यातील रेषा काही वेळा पुसली आहे. ती याच कारणास्तव आणि

(पृष्ठ २९ वर)

(उर्वरित लेख मागील अंकापासून पुढे...)

मानापमान नसणे, दंभ नसणे, अहिंसा, क्षमाशीलता, मन-वाणीचा सरळपणा, गुरुसेवा, अंतर्बाह्य शुचिर्भूतपणा,स्थैर्य, मन-इंद्रियांसह शरीरनिग्रह, इह व परलोकीच्या भोगांविषयीं वैराग्य, अहंकाराचा अभाव, जन्म, मृत्यु, वार्धक्य, व्याधि, दुःख ह्याच्या ठिकाणी वरचेवर दोषदृष्टीने पाहणे, अनासक्ति, स्त्री-पुत्र-घरदार इत्यादिकांशी लंपट नसणे, इष्ट किंवा अनिष्टप्राप्त झाले तरी नेहमी चित्ताची समता बाळगणे, माझ्या ठायीं अनन्यभावाने अढळ भक्ती, एकांतवास व तीर्थक्षेत्रांत वस्तीची आवड, आणि लोकसमुदायांत जाण्याचा व रहाण्याचा कंटाळा या गुणांनी युक्त असलेला माणूसच ज्ञान प्राप्तीसाठी पात्र आहे

हे गुण असणारा माणूस जेव्हा ज्ञान मिळवतो तेव्हा त्याला ज्ञानी म्हणतात. या ज्ञान आणि अज्ञानाची व्याख्या अकराव्या श्लोकांत केली आहे.

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्वज्ञानार्थदर्शनम ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतो ऽ न्यथा ।।११।।

अध्यात्मांत निष्ठा आणि सदैव सत्यज्ञानाच्या कर्त्यावर सदैव दृष्टी म्हणजेच ज्ञान (हे केवळ मन उच्च जाणिवेंत राहील तरच साध्य होईल) याव्यतिरिक्त असेल ते सारे अज्ञान असा ११ व्या श्लोकांत निर्वाळा दिला आहे.

वैदिक अथवा निसर्ग शास्त्राचे विभाग पाडून त्यांत काहींत निष्णात होणे म्हणजे ज्ञानी होणे नव्हे याविषयीं भारतीय तत्वज्ञान ठाम आहे. श्रीज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथांत हीच संकल्पना समजावून सांगण्यासाठी तेराव्या अध्यायांतील श्लोक क्रमांक १८४ ते ८६३ एवढा (जवळजवळ ७०० श्लोकांचा) व्याप वापरला आहे.

पुरातन काळी भारतवर्षांत अनेक राज्ये, व राज्यपद्धती होत्या तरीही प्रत्येक शासनाचे पदरी विद्वान अगर ज्ञानी पंडित असायचेच. राज़्य चालवतांना किंवा न्याय देतांना त्यांचा हमखास उपयोग केला जात असे. हे ज्ञानी लोक राजाचे उपाध्ये पण असत. राज्य जरी क्षत्रिय राजे चालवीत तरीही त्यांच्यावर धर्माचा प्रभाव असायचा व तो राजा त्या विद्वानाच्या सल्ल्यानेच चालायचा. हे ज्ञानी पंडित दरवर्षी वाराणशी येथे तेथील धर्मपंडितांच्या देखरेखींत जमून काही क्लिष्ट प्रश्नांवर वादविवाद करून निर्णय करीत. त्याचप्रमाणे पंडितांत प्रतीही ठरत असत. काही पंडित तर राज्याराज्यांत हिंडून तेथील पडितांशी वादस्पर्धा करीत आणि जिकल्यावर तेथील राजांकडून 'अजिंक्यपत्रेही' मिळवीत. पुढे चंद्रगुप्ताच्या काळांत तर अरबस्तानांतील मेखला (हल्ली या स्थानालाच मक्का म्हणून ओळखले जाते

व ते मुस्लिमांचे अतिपवित्र स्थान आहे) येथील शिवमंदिराच्या आवारांतही वाराणशीसारखीच धर्मसभा भरत असे. हे ज्ञानी पंडित गुरुकुलामध्ये वेदविद्या शिकून ज्ञान मिळवण्याचा मार्ग पत्करीत त्यामुळे सर्वज्ञाबरोबरच ते धर्मज्ञही असत. त्यांचा ज्ञानमहासागरापर्यंत जाण्याचा मार्ग अत्यंत प्रशस्त आणि सदैव चालू असायचा. राजांना राज्यकारभारांत धर्मसंमत मार्गदर्शनही करीत.नावाजलेल्या पंडितांना वेगवेगळे राजे त्यांना वर्षासन देऊन आपल्या पदरी बाळगत असत.

अर्थात त्यावेळीही या विद्वानाचे ज्ञान (त्याच्या गैरहजेरीत वापरण्यासाठी) लिहून ठेवण्याचे काहीही प्रयत्न झाले नाहीत. ते शक्यही नव्हते. काही अडचण निर्माण झाली तर ज्ञानी माणसाला त्यावर उपाय विचारून तिचे निवारण करण्याचा प्रयत्न केला जाई. शिवाय हे ज्ञान त्या विद्वानाचेच मनांत रहाणार व लागेल तेव्हा त्यांचा सल्ला आपल्याला घेता येईल याची सर्वांना खात्री असायची.

कलियुग सुरू झाल्यापासून भारतीयांचीच (प्रथम पंडित, राजेरजवाडे आणि नंतर सामान्य लोक अशा क्रमवारीने) वेदविद्येवरील श्रद्धा कमी होत गेल्यामुळे ज्ञानी लोकांना अवकळा आली आणि त्यांचा तुटवडा पडू लागला. पुढे तर इस्लाम आणि इंग्रज याच्या अंमलाखाली या ज्ञान प्रसाराची अगदीच दुर्लक्ष झाले? आता तर वेदविद्या, निसर्ग अथवा जीवनशास्त्र विषयही इतर छोट्याछोट्या शास्त्रशाखांत वाटून आम्ही शिकू लागलो त्यामुळे ज्ञानही आमच्यातून नाहीसे झाले. आता एखाद्या शाखेत आम्ही काही खास उच्च ज्ञान मिळवून डॉक्टरेट मिळवली तर आपला तो छोटासा (सखोल माहिती मिळवलेला) भाग सोडून इतरत्र आम्ही किती अज्ञानी आहोत याचीच प्रकर्षाने जाणीव होऊ लागते. हल्ली तर आम्ही निसर्गाशीही फटकून वागत असल्यामुळे व विज्ञानाचा गर्व झाल्यामुळे निसर्गही आमच्या मनापासून दूर गेला व नैसर्गिक संकटाचीही आम्हाला पूर्व सूचना मिळेनाशी झाली आहे. वास्तविक पहाता ज्ञान म्हणजे विज्ञान अधिक प्रतिभा पण प्रतिभेची आम्ही विज्ञानापुढे काही पत्रासच ठेवली नाही मग संपूर्ण ज्ञान कसे मिळणार?

हे ज्ञान साठवता येणार नाही त्यामुळे याचे व्यवस्थापनही अशक्य आहे. प्राचीन काळांतही जेव्हा एखाद्या राजास कारभारांत काही अडचण निर्माण होई व त्याचे पदरी कोणी (योग्य?) पंडित नसेल तेव्हा शेजारच्या मोठ्या राजाच्या पंडितांना सन्मानाने बोलावून त्याचेकडून अडचण निवारणाचे प्रयत्न केले जात.

वर स्पष्ट झाल्यानुसार पाश्चात्य विचारधारेनुसार विषयाविषयांतील ज्ञात्यांकडून काही प्रत्यक्ष उपयोगी माहिती जमवणे व त्याचे ज्ञानबाड किंवा ज्ञानकोश (Encyclopedia) बनवणे शक्यतेतील गोष्ट आहे. आता त्यांतील माहिती ज्ञान या संज्ञेस पात्र होईल की नाही हे तिच्या उपयोगाचे प्रयोजन असेल तेव्हाच ठरू शकेल. सहसा ती माहिती तशीच्या तशी उपयोगांत येणे जवळजवळ अशक्यच आहे, त्यामुळे त्याला

ज्ञान म्हणणे शक्य होणार नाही. बऱ्याच वेळां अनेक विषयांतील (ज्ञानबाडातील) माहिती आलेली अडचण दूर करण्यासाठी वेगवेगळ्या प्रमाणांत एकत्रित करावी लागेल, त्यामुळे त्याही माहितीला ज्ञान म्हणता येणार नाही. अशा रीतिने कधी कधी व वेगेवेगळ्या प्रकाराने व प्रमाणांत एकत्रित करावी लागलेली माहिती एका बाडांत साठवून ठेवणे ही एक अत्यंत खर्चिक आणि वेळही वायां घालवणारी बाब ठरेल. त्यामुळे अर्थातच या (असल्या) ज्ञानाचे व्यवस्थापनही करणे अशक्य आहे. प्रत्येकवेळी अडचण येईल तेव्हा ब्रेन स्टॉर्मिंग द्वारा तिचे निवारण करणे व्यावहारिक ठरेल.

भारतीय तत्वज्ञानानुसार ज्ञान जमवणे/एकत्र साठवणे शक्य नाही. आपापल्या ज्ञानावर त्या त्या माणसाचे प्रभुत्व असते आणि ते एकत्र साठवून भविष्यांत (आवश्यकतेनुसार) वापरणे अशक्य काम आहे अर्थातच त्याचे व्यवस्थापनही शक्य नाही.

**सांप्रतच्या प्रश्नावर उपाय**

जर कोणत्याही विचारधारेनुसार ज्ञानाची सांठवणूक आणि त्याचे व्यवस्थापन भविष्यांतील आवश्यकतेसाठी करता येत नाही हे सत्य असले तरी मग आवश्यक असतांना ज्ञान मिळवायचे कसे? थेट ज्ञानी माणसाकडून ते ऐनवेळीच मिळवले पाहिजे. थोडक्यांत म्हणजे अशी ज्ञानी मंडळी प्रत्येक संस्थेच्या पदरी असली पाहिजेत. मध्ययुगांत मारवाडी व खास करून माहेश्वरी पंथीय आपल्या संस्थातून अशी मंडळी बाळगीत व आपल्या भावी अडचणींवर मात करण्याचा प्रयत्न करीत. पाश्चात्य संस्थापुढे अशी तत्वज्ञानातील निष्णात मंडळी कोठून आणायची अशी शंका उभी राहील. पण भारतीय विचारधारेनुसार ते सहजसाध्य आहे व त्यासाठी गुरुकुलांतून औपपत्तिक आणि प्रायोगिक (Theoretical and practical) अशा दोन्ही प्रकारच्या वेदांताच्या शिक्षणाने ज्ञानी पंडित बनलेले प्रत्येक राज्यांत राज्यकर्त्यांना सल्ले देण्यासाठी असले पाहिजेत. भारताच्या केंद्र शासनाने राज्याराज्यातून अशी गुरुकुले काढून सारी सचीवमंडळी तेथून स्नातक होणाऱ्या ब्रह्मचार्यातून नेमली पाहिजेत. सुरू केल्यापासून १५-२० वर्षांत सारीं राज्ये (आणि केंद्रही) या ज्ञानी सचीव सल्लागारांनी भरून जातील. आवश्यकतेपेक्षा जास्त असलेले स्नातक इतर संस्थांना उपयुक्त ठरू शकतील. ही मंडळी नेहमीच निसर्गाशी जवळचे नाते ठेऊन असल्यामुळे त्यांचे सल्ले व्यवस्थित अंमलांत आणल्यावर निसर्ग त्या निर्णयांना मदतच करील आणि राज्यांचे आणि देशाचेच काय पण साऱ्याच संस्थांचे अनुशासन काहीही अडचणी न येता जनतेच्या कल्याणाचेच कार्य करीत राहील.

## संदर्भ

१. या विषयाबाबत प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध होणारे साहित्य.

२. Far Eastern Economic Review issue dated 28 Jul 2004.,

(पृष्ठ १३ वर)

## गीतकृष्णायन
## भाग ६ . युगांत

**प्रसाद औटी**

योगेश्वर श्रीकृष्ण म्हणजे यश, आरोग्य, सुख आणि समाधान यांचं जणू प्रतीकच. किंबहुना गोविंद हे आनंदाचंच सगुण स्वरूप! अशा त्या परमेशाचं विश्वमोहन व्यक्तिमत्व, देदिप्यमान चरित्र आणि मार्गदर्शक शिकवण जनमानसापर्यंत मनोरंजक पद्धतीने पोहोचविण्याच्या आर्तातून जे निर्माण झालं तेच हे 'गीतकृष्णायन' !

'गीतकृष्णायन' हा एक पुष्पहार आहे. गोष्टीरूप धाग्यात गीतसुमने गुंफलेला ! ह्यातील गीतं कृष्णाच्या संपूर्ण आयुष्यातील निवडक प्रसंगांवर आधारीत असून मराठी भाषेच्या पदयदालनातील अनेकविध सुंदर जाति, छंद आणि वृत्तांचा वापर करून रचण्यात आली आहेत. सुसूत्र निवेदनाने ती एकत्र ओवली गेली आहेत.

भगवान श्रीकृष्णाच्या आनंददायी आणि उद्बोधक लीलांचा हा गोपाळकाला सर्वच रसिकांना रिझवून जावो हीच त्रिभुवनमोहन भगवान श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना !

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

•••

---

(पृष्ठ क्र.१२ वरून... **ज्ञान आणि ज्ञान व्यवस्थापन**)

३. Indian Journal of Training and Development Vol. XXXI No. 4 (Oct-Dec 2001),

४. श्री समर्थ रामदास रचित 'दासबोध' समास ५.

५. श्रीमद्भगवद्गीता अध्याय १३.

६. Urgency of Change in Education System - Prof M.D. Apte published in 'TRUTH' Weekly of 24 Dec '04

७. भारतीय मानसशास्त्र - डॉ. कृष्णाजी केशव कोल्हटकर

८. Modern Science and Vedic Science - Bi-annual interdisciplinary journal being published by Maharishi University of Management Fairfield, Iowa USA.

**मेजर मु. दि. आपटे**
३२, रक्षक सोसायटी,
औंध कॅंप पोस्ट ऑफिस,
पुणे - ४११०२७

•••

'प्रपंच (संसार) हा परमार्थाच्या मार्गात मोठाच अडसर ठरतो' असे जे पूर्वापारपासून संन्यासमार्गी योगी सांगत आले आहेत ते बिलकुल खरे नाही. उलट 'हाती काम नी मनीं राम' या नामसाधन शास्त्राच्या शिस्तीने संसार केल्यास 'प्रपंच' हे परमार्थाचे मोठेच (आणि सोपेही) साधन बनू शकते. असे श्री. गोंदवलेकर महाराज ठासून सांगतात.

**प्रपंच परमार्थाच्या मार्गी बाधक घेतसे।**
**संन्यासमार्गी म्हणती ऐसे, परि न ते खरे।।**

**विरोधी नच संसार परमार्थासि तो कदा।**
**प्रपंच साधन मोठे परमार्थासि साधण्या।।**

एरवी सर्व गोष्टी भस्मसात करणारा 'अग्नी' नियंत्रित करून युक्तीने योजल्यास जसे अन्न शिजविण्याचे उपयुक्त साधन बनू शकतो. त्याचप्रमाणे एरवी आसक्तीत बुडून केलेला प्रपंच परमार्थाला घातक ठरत असला तरी तोच प्रपंच योगयुक्तीने केल्यास परमार्थ साधण्याचे मुख्य साधन बनू शकतो.

२) चारी आश्रमांत गृहस्थाश्रमच श्रेष्ठ आहे असेच वेदविद्या सांगते. ब्रह्मचर्याश्रमातील विद्यार्जन करणाऱ्या व्यक्तींचे पालन पोषण, त्याचप्रमाणे वानप्रस्थाश्रमी वृद्धांचा निर्वाह गृहस्थाश्रमीच करीत असतो, घरात चूल न पेटवणाऱ्या (निरग्नि) संन्यासांना अन्नाची भिक्षा गृहस्थींच्या घरांतूनच मिळते.

३) गृहस्थीने आपला संसार, कर्माला ज्ञानव भक्तीची जोड देऊन सर्व कर्मांत देवाचे अधिष्ठान ठेवून गीतेच्या ९ व्या अध्यायात सांगितलेल्या राजगुह्य योगाच्या युक्तीने केला तर तो गृहस्थ प्रपंचात व परमार्थात दोन्हींकडे यशस्वी होतो. अशा गृहस्थास त्याच्याशी एकरूप झालेल्या राजयोग साधक पत्नीची जोड मिळाल्यास तर त्यांच्या संसारात परमेश्वरच (कोणत्यातरी रुपात) वस्तीस राहतो. एकनाथ आणि त्यांची साधी पत्नी गिरिजा यांचया आदर्श संसारातील गृहसौख्य चाखण्याचा मोह परमेश्वरालाही आवरता आला नाही; आणि ते चाखण्यासाठी तो त्यांच्या घरी पाणक्या म्हणून राहिला होता, ही गोष्ट सर्वश्रुत आहे.

४) प्रपंचात गृहस्थी धर्म, अर्थ काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ साधू शकतो हाच गृहस्थाश्रमाचा विशेष आहे.

प्रपंचात चालून आलेली सर्व नियत कर्मे, दुर्लक्ष न करता सर्वबलबुद्धीपणास लावून नेटाने परंतु फळाशा सोडून, देवाचे अधिष्ठान राखून करावी. परमार्थ साधण्याच्या उत्साहात प्रपंचातील कर्तव्यांकडे अजिबात दुर्लक्ष करू नये असेच वेदविद्या सांगते. श्रीगोंदवलेकर महाराजांनी या संदर्भात दळणाऱ्या जात्याची छान उपमा दिली आहे.

**प्रपंचाच्याच जात्याची देहाची वरची तळी।**
**फिरु द्यावीच ती तैशी प्रारब्ध फिरवी जशी।।**

**परी तळी मनाची ती असावी खालची स्थिर।**
**नामांत समबुद्धीने, शान्तीचे मीळण्या पीठ।।**

प्रपंचात सगळीकडे आकर्षक मोह पाडणारे कामोपभोग दिसत असले, तरी विषयेन्द्रिय संयोगाने मिळणारी सुखे टिकावू नसतात. ती अल्काळच राहतात पण त्या सुखांबरोबर येणाऱ्या उपाधींचे दुःख मात्र बराच वेळ मागे रेंगाळत राहते. एखादी कामना प्रयत्न करूनही तृप्त झाली नाही तर दुःख, बरे ती तृप्त झाली तरी आणखी हाव वाढते व वाढलेली इच्छा तृप्त होईपर्यंत मनावर ताण कायमच राहतो. एकूण काय, प्रपंचात 'सुखाचा धागा एक तर शंभर धागे दुःखाचे' हेच खरे! तुकाराम बुवांनीही 'सुख जवाएवढे दुःख पर्वताएवढे' असेच म्हटले आहे.

**न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति।**
**दृविष्य कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते।।**

असे महाभारतात पुष्कळ वर्षे कामोपभोगांत डुंबून राहिल्यानंतर ययातीच्या तोंडी व्यासांनी उद्गार घातले आहेत. याच संदर्भात श्री गोंदवलेकर नीमगीतेत असा श्लोक आहे.

**५) कामांच्या उपभोगाने काम होई न शान्त तो।**
**उलटा आणखी भडके जैसे काष्टेंचि अग्नि तो।।**

असा प्रपंच तो सगळीकडे दुःख भय काळजीने भरलेला आहे, तो कोणत्या युक्तीने करावा की ज्यामुळे गृहस्थी परमार्थ साधताना भय–काळजींपासून दूर राहून आनंद व समाधान जावू शकेल? अशी ती युक्ती म्हणजे गीतेच्या ९ व्या अध्यायात सांगितलेला राजगुह्य योग आचरणे हेच होय. श्री गोंदवलेकर नामगीतेत या संदर्भात विस्तृत विवेचन केले आहे.

**अर्थमनर्थं भावच नित्यं। नास्ति ततः सुखलेशः सत्यम्।। (भजगोविन्दम्)**

शंकराचार्यांपासून सर्वच आचार्यांनी संतांनी व पंडितांनी धनाची निन्दा केली आहे. लहानपणी एकमेकांसाठी जीव देण्यास तयार असणारे भाऊ मोठेपणी या धनाच्या कारणी एकमेकांचे कट्टे शत्रू झालेले आपण व्यवहारात पुष्कळ वेळा पाहतो.

६) परंतु गोंदवलेकर महाराजांनी असा एकतर्फी उपदेश न करता या बाबतीत दुसरी व्यावहारिक बाजूही नामगीतेत मांडली आहे. ते म्हणतात धन नव्हे तर धनाचा स्वैर लोभ (हाव) अनर्थाला कारण असतो. धनाशिवाय संसारात पानही हलत नाही. आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यास धन अवश्य आहेच. पण कोणतेही सत्कर्म व धर्मकृत्यही धनाशिवाय संपन्न होणे अशक्यच असते. म्हणून गरजेपुरते धन प्रत्येक गृहस्थीने मिळवावेच, पण गरजेपेक्षा विपुल धनही चांगल्या मार्गाने आपल्या कर्तृत्वाने जरुर मिळवावे, म्हणजे त्या धनाचा दानधर्मादी धर्मकृत्ये करून परमार्थ साधण्यास उपयोग होईल. महाराज पुढे म्हणतात, फक्त धन मिळविताना, त्याचा मोह ठेवता कामा नये व धन मिळाल्यावर त्याचा स्वामी ईश्वरच आहे असे समजून (मानून) आपण केवळ त्याच्या मुनिमाप्रमाणे व्यवहार केला पाहिजे. अर्थात धनार्जनात व्यस्त असताना सुद्धा नाम घेणे

सोडू नये. आपण संसारात करतो त्या प्रत्येक व्यवहारात ईश्वराचे अर्धष्ठान असले पाहिजे. हा संसार माझा नसून तो रामाचाच आहे. आणि मी केवळ त्याचा प्रतिनिधी म्हणून तो चालवीत आहे अशी भूमिका गृहस्थीने ठेवली पाहिजे. थोडक्यात केवळ साक्षीभावाने संसार करावा. यशाने हुरळून जाऊ नये वा अपयशाने खचून जाऊ नये. या संदर्भात, 'महाराज'. नाटकातील नटाची व भातुकलीच्या खेळाची फार सुंदर उदाहरणे देतात.

**रंगभूमीवरी जैसा भूमिका तो करी नट।**
**तन्मयें, तो परी जाणे, असे हे मात्र नाटक।।**

**तैसे प्रपंची वागावे मानता तेंचि नाटक।**
**भूमिका दिली देवाने, करावी मन लावून।।**

**भातुकलीतला खेळ मुले ती खेळती जशी।**
**मोडती संपता खेळ, बिना खंत ही ती जशी।।**

**तसे प्रपंची वागावे गुणांचा खेळ हा जणु।**
**मानावी सुखदुःखेही खेळांतील चि ती जणु।।**

नाम घेत ईश्वरावर मन केंद्रित करण्यामधे संसारातील सुखदुःख भय काळजी यांचा त्रास होऊ नये म्हणून. वरील उदाहरणे देऊन महाराज प्रपंचाला साक्षीभावाने संसार करण्यास सांगत आहेत.

**दुःखदायक ना व्हावा प्रपंच जर वाटते।**
**साक्षीत्वाने रहाणे ते शिकले तर पाहिजे।।**

७) महाराज प्रपंचीला आणखीन एक व्यावहारिक सल्ला देतात. नामसाधकाने दुसऱ्यांशी सदाचाराने वागावे. कोणाचे वाईट चिंतू नये किंवा कोणाला फसवू नये. परंतु जगात सर्वच माणसे सदाचारी नसतात हे सत्यही त्याने लक्षात ठेवले पाहिजे. लबाड व कपटी माणसांशी वागताना त्यांनी आपल्याला फसवू नये आपण फसले जाऊ नये, म्हणून त्यांचे कपट वेळेवर ओळखण्याची धूर्तता मात्र सदाचारी माणसाने बाळगली पाहिजे.

**जगी असावे तत्पर ठेवता नित्य धूर्तता।**
**जाणण्या कपट लोकांचे, डावपेचही जे सदा।।**

**स्वयें लबाडि करूनी लोकांना फसवू नये।**
**धूर्त मात्र रहावे की, लोकांनी फसवू नये।।**

असेही सांगण्यात महाराज विसरले नाहीत. इतर संतांपेक्षा महाराजांचे आगळेपण यातच स्पष्ट होते.

८) अतिथिदेवो भव। हा औपनिषदिक उपदेशही 'महाराज' प्रकर्षाने करतात. गृहस्थीने घरातले वातावरण असे ठेवावे की कोणत्याही अतिथीला त्या घरात पाहुणचार घेण्यास संकोच वाटू नये. अतिथीचे होणारे स्वागत व पाहुणचार हेच गृहस्थीचे खरे वैभव होय.

गृहस्थीने विद्या धन आणि प्रतिष्ठाही मिळविण्यासाठी आपली कर्तबगारी जरुर खर्ची घालावी. संसारात साक्षी भावाने वागत असताना संसारात जे सुख ऐश्वर्य लोकप्रेम प्राप्त होईल त्याचा आनंदाने जरुर उपभोग घ्यावा, पण तो नम्रवृत्तीने. प्राप्त ऐश्वर्य भोगताना मी कर्ता, माझ्या कर्तृत्वानेच हे ऐश्वर्य मिळत आहे असा अहंकार मात्र गृहस्थीच्या एरवी शुद्ध मनात डोकावू नये.

**विद्या धन प्रतिष्ठाही मिळवाव्या गृहस्थिने।**
**सुखे ऐश्वर्य भोगावे राहुनी नम्र वृत्तिने।।**

**ऐश्वर्य भोगता मात्र असावा राम अंतरी।**
**'मी कर्ता' हा अहंकार नसावा शुद्ध त्या मनीं।।**

९) सद्गुरुचा सहवास लाभून त्याची सेवा केल्यानंतर गुरुकडून मिळालेल्या उपदेशानुसार केलेल्या साधनेला लवकर सिद्धी प्राप्त होते. परंतु असे भाग्य फारच थोड्या लोकांना लाभते. म्हणून सामान्य प्रापंचिकांना महाराजांचे असे सांगणे आहे की त्यांनी रामदासादी संतांनी सांगितलेल्या मार्गाचाच अवलंब करावा. तो कसा करावा त्याची गुरुकिल्ली अशी आहे.

**संतांचे वच वाचावे, व्हावे मनन त्यावरी।**
**उमजे जे मनीं जेची यावे ते वागण्यांत ची।।**

महाराज म्हणतात, अन्न खाण्यास काही मिनिटे लागतात पण पचविण्यासाठी काही तास लागतात. खाल्लेले अन्न उत्तम पचले तरच त्याचा शरीराला फायदा होतो. त्याप्रमाणे संतांचे वच वाचल्यावर त्यावर त्याहीपेक्षा जास्त काळ मनन व्हावयास हवे. मनन झाल्यावरच त्या संतवचनांतले मर्म वाचकाला उमजेल आणि जे मनात उमजले ते वाचकाच्या वागण्यात उतरले तरच संतांनी दाखविलेला मार्ग त्याने अवलंबिला असे होईल.

या सर्व उपदेशाचे सार खालील श्लोकांत आले आहे.

**देहाने कार्य करता मनाने नामिं राहता।**
**प्रपंच नेटका होई परमार्थहि साधता।**

**हातीं काम मनीं राम प्रपंची वागता असे।**
**प्रपंच नेटका होई परमार्थही तो घडे।।**

१०) संतांनी दाखविलेला मार्ग घेऊन त्यांनी सांगितलेली सर्व पथ्ये कटाक्षाने पाळल्यास मनुष्य आपणच आपला मित्र बनतो व त्याच्या सहाय्याने परमार्थ मार्गावर आपली प्रगती करू शकतो. परंतु संतांनी दाखविलेल्या मार्गाच्या विरुद्ध दिशेने गेल्यास मनुष्य आपलाच आपण शत्रू बनतो व त्याच्या नादी लागून आपला संपूर्ण घात करून घेतो.

**मीच मित्र असे माझा शत्रूही मीच तो असे।**
**मीच माझ्या जीवनाचा शिल्पकार खरा असे।।**

११) प्रपंचातील प्रत्येक कार्यात परमेश्वराचे अधिष्ठान असावे असे राजगुह्य योग सांगतो. तसे अधिष्ठान राहण्यासाठी सोपी युक्ती महणजे आपण करत असलेल्या कर्तव्य-कर्माला परमेश्वराशी जोडणे ही होय. उदाहरणार्थ - गृहिणीने स्वयंपाक करताना 'माझ्या पतीला मुलांना व कुटुंबीयांना घरगुती, त्यांच्या आवडीचे, सकस अन्न जेवावयास मिळावे अशी परमेश्वराची (इच्छा) योजना आहे व त्यासाठी त्यानेच माझी गृहिणी म्हणून या कुटुंबात नेमणूक केली आहे व त्याच्या आज्ञेचे पालन म्हणूनच मी हा स्वयंपाक करीत आहे अशी भावना ठेवावी. असे केल्याने स्वयंपाक उत्तम होईलच पण त्याचबरोबर परमेश्वराची सेवाही अनायासे तिच्या हातून घडेल.

१२) उपसंहार - संसारी गृहस्थीने, प्रपंच म्हणजे 'सुख जवापाडे दुःख पर्वताएवढे' असे

(पृष्ठ २९ वर)

ह्यावर्षी कन्याकुमारी येथील विवेकानंद शिलास्मारकाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. हे शिलास्मारक देश-विदेशातील लोकांसाठी 'उर्जेचा प्रेरणास्त्रोत' बनले आहे. आत्तापर्यंत कोट्यावधी लोकांनी स्मारकाला प्रत्यक्ष भेट दिली आहे. इथून आपापल्या कामांसाठी अनेकांनी प्रेरणा प्राप्त केली आहे. ह्या शिलास्मारकाच्या निर्मिती मागे एक रंजक, प्रेरक कथा आहे.

१९६२ साल, स्वामीजींचे जन्मशताब्दी वर्ष सुरु झाले. रामकृष्ण मिशनने ठरविले यानिमित्ताने स्वामीजींचे जीवनचरित्र, भाषणे, व्याख्याने व त्यांची पुस्तके व त्यांच्यावरील साहित्य जगभरात पोहोचवावे. दुसरीकडे कन्याकुमारीतील काही लोकांनी तीन समुद्रांमध्ये उभ्या असलेल्या श्रीपादशिलेवर स्वामीजींचे स्मारक उभे करावे, असा विचार केला. स्वामीजींनी आपले गुरु रामकृष्ण परमहंसांच्या मृत्युनंतर त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या शिष्यगणाची व्यवस्था लावली आणि भारत परिक्रमेला सुरुवात केली. परिक्रमा करीत असतांना भारताचे खरे रूप त्यांच्या दृष्टीस पडले. राजेरजवाड्यांपासून झोपडीपर्यंत सर्व समाजातील माणसांना ते भेटले. काळ होता १८८९ ते १८९२ चा भारतीयांचा आत्मविश्वास खच्ची झालेला होता. अज्ञान, वाईट रुढी, धार्मिक तेढ यामुळे समाज हतबल होता. ब्रिटिशांनी आपले शिक्षण, अन्यान्य व्यवस्था, संस्कृती, संपन्न परंपरा नष्ट करण्याचा चंग बांधला होता. महान इतिहास असणारा 'भारत देश' जर्जर झालेला होता. स्वामीजी कन्याकुमारीला पोहोचले. २५, २६, २७ डिसेंबर १८९२ हे तीन दिवस श्रीपादशिलेवर त्यांनी ध्यान, मनन, चिंतन केले आणि आपल्या गुरुंना अपेक्षित असे जीवनाचे ध्येय त्यांना इथे गवसले. भारताचा गौरव त्याला परत मिळवून देण्यासाठी १८९३ ला अमेरिकेतील शिकागो येथे भरणाऱ्या धर्मपरिषदेला जाण्याचे त्यांनी ठरविले. पुढचा उज्ज्वल इतिहास आपण जाणतोच. म्हणूनच स्वामीजींचे स्मारक त्यांना योग्य दिशा, ध्येय गवसलेल्या श्रीपादशिलेवर व्हावे असे अनेकांना वाटत होते. यातूनच एक समिती प्रत्यक्षात आली.

'श्रीपादशिलेवर स्वामीजींचे स्मारक व्हावे' हा विचार देशभरांत पसरला व त्याला पाठिंबा मिळू लागला. कन्याकुमारीमधील काही ख्रिश्चन बांधवांचा याला प्रखर विरोध होता. थोड्याच दिवसांत श्रीपादशिलेवर किनाऱ्यावरुन दिसेलसा मोठा क्रॉस उभा राहिला. अर्थातच याचे समाजात पडसाद उमटले. जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री, प्रधान मंत्र्यापर्यंत प्रतिक्रिया पोहोचल्या. ही श्रीपादशिलाच आहे. जिथे स्वामीजींनी ध्यान केले हे सरकारलाही मान्य असल्याने तिथे तशा मजकुराचा शिलालेख लावावा असे सरकारने मान्य केले. दरम्यान एका रात्री क्रॉसला जलसमाधी मिळाली. त्यावेळचे तामीळनाडूचे मुख्यमंत्री भक्तवत्सलम यांना

समाजातील तेढ नको होती. त्यांनी श्रीपादशिलेवर स्मारकाऐवजी शिलालेख लावावा याला मान्यता दिली. समितीने शिलालेखाला संमती देऊन, स्मारकाची मागणी लावून धरली. दरम्यान काही लोकांचा विरोध स्मारकाचे महत्व या बाबी लक्षात घेऊन राष्ट्रीय स्तरावर समितीचा विस्तार केला गेला. या कामासाठी योग्य व्यक्ती निवडली गेली. मा. एकनाथजी रानडे हे 'असाध्य काम साध्य' करु शकतील या विश्वासाने त्यांना विचारले. त्यांच्या स्वभावानुसार सर्व परिस्थितीचे योग्य आकलन माहिती करून घेऊन, रामकृष्ण मिशनच्या अध्यक्षांच्या भेटीनंतर स्मारकाबाबतचा सर्व पत्रव्यवहार पाहून त्यांनी काम करायला मान्यता दिली. ११ ऑगस्ट १९६२ ला 'संघटन सचिव' हे शिलास्मारकाच्या राष्ट्रीय समितीचे पद त्यांनी स्वीकारले.

एखादे काम हाती घेतल्यावर त्यातील समस्या जाणून मूळापर्यंत जाण्याच्या एकनाथजींच्या स्वभावानुरुप स्मारकाला कोणाचा विरोध आहे व तो कसा दूर करता येईल हे प्रथम त्यांनी पाहिले. त्यावेळी भारताचे सांस्कृतिक मंत्री होते. प्रा. हुमायुन कबीर, ते कलकत्त्याचे खासदार होते. त्यांच्यामते श्रीपादशिलेवर स्मारक उभे करण्याने नैसर्गिक सौंदर्याला बाधा पोहोचेल. त्यांच्या या विरोधाचा आधार घेऊन तामीळनाडूचे मुख्यमंत्री भक्तवत्सलमही स्मारकाला विरोध करीत होते. एकनाथजींचा कलकत्त्याशी १५-२० वर्षे संपर्क होता. रामकृष्ण मठाच्या प्रतिनिधींसह ते कलकत्त्यातील वृत्तपत्राच्या अनेक संपादक, पत्रकारांना भेटले. बंगालच्या सुपुत्राच्या स्मारकाला, बंगालच्या खासदाराचा विरोध होत आहे. ही परिस्थिती सांगून पत्रकार परिषद घेतली. यावर अनेक वृत्तपत्र व मासिकांमध्ये लेख छापून आले. ताबडतोब हुमायुन कबीरांनी एकनाथजींना भेटीला बोलाविले व आपला विवेकानंद स्मारकाला विरोध नसल्याचे स्पष्ट केले. या भेटीचे वृत्त तयार करून एकनाथजींनी त्यावर हुमायुन कबीरांची स्वाक्षरी घेतली.

एकनाथजी भक्तवत्सलम्‌ना भेटले, संवाद सुरु ठेवला. लालबहादूर शास्त्री, एम. सी. छागला, राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांनाही विवेकानंदांचे स्मारक श्रीपादशिलेवर व्हावे असे वाटत होते. एकनाथजींनी दिल्लीत सर्व खासदारांशी संपर्क साधणे सुरु केले. लालबहादूर शास्त्रींनी योगय वेळ येताच मदत करण्याचे आश्वासन दिले होते. १९६३ साल संपायला केवळ दोन महिन्याचा अवधी उरला होता. एकनाथजींनी श्रीपादशिलेवर स्मारक बांधणीच्या मसुद्यावर त्यावेळी दिल्लीत हजर असलेल्या ३२३ खासदाराच्या सह्या अवघ्या ३ दिवसांत मिळविल्या. राष्ट्रहिताच्या गोष्टीत राजकारण दूर ठेवून पक्षभेद, पंथभेद दूर ठेऊन सर्व एकत्र आले. त्यांना संवाद व संपर्क माध्यमाने एकत्र आणण्याचे काम एकनाथजींनी केले.

२ प्रतींमधील तो समुदा त्यावेळचे विदर्भाचे खासदार माधवराव अणे यांच्या हस्ते प्रतप्रधान मा. जवाहरलाल नेहरूंना देण्यात आला व दुसरी प्रत भक्तवत्सलमना. आता

लालबहादुरजींचे काम सुरु झाले. जवाहरलालजींशी त्यांनी संवाद साधला. 'पंतप्रधानांकडून समितीला होकार तर मिळाला पण ही बाब मद्रास सरकारच्या अखत्यारीतील आहे.' भक्तवत्सलम यांच्याशी मी बोलेन असे पंडितजींनी सांगितले. विनंती अर्ज, सह्या ह्यामुळे परिस्थिती अनुकूल झाली.

भक्तवत्सलम यांच्यामते स्मारक फार फार तर १५ फूट'' x १५ फूट एवढेच असावे. पुतळा बंदिस्त जागेत उभारावा. मान्यता तर मिळाली. एकनाथजींनी सांगितले, मी याबाबत ५-६ लोकांशी बोलतो, मग ठरवू. एक पंतप्रधान, दुसरे राष्ट्रपती, तिसरे सांस्कृतिक मंत्री, चवथे लालबहादूर शास्त्री, पाचवे रामकृष्ण मठाचे अध्यक्ष व सहावे कांची कामकोटीचे शंकराचार्य. भक्तवत्सलमनी हे मान्य केले. शंकराचार्यांबद्दल त्यांना अत्यंत, आदर व श्रद्धा होती. स्थपती, एस. के. आचारी यांना भेटून स्मारकाची ५-६ संकल्प चित्रे बनविली. शंकराचार्यांनी यात बराच पुढाकार घेतला. त्यांनी मान्यता दिलेले संकल्पचित्र घेऊन एकनाथजी भक्तवत्सलमना भेटले. शंकराचार्यांनी 'मान्य केलेला नमूना मलाही मान्य आहे' अशी स्वीकृती त्यांच्याकडून मिळाली. स्मारकाचा आकार ठरला ९१ फूट लांब व ३२ फूट रुंद. आज श्रीपाद मंडपम वगळता प्रत्यक्षात १८० फूट लांब व ५६.।।. फूट रुंद असे स्मारक साकारले आहे.

स्मारक तीन समुद्रांमध्ये असणाऱ्या शिलेवर होणार होते. त्यामुळे प्रथम शिलेची तपासणी केली गेली, तिची कार्डिओग्राफ काढणे, स्मारकासाठी योग्य दगडाची निवड, ज्याच्यावर खाऱ्या पाण्याचा परिणाम होणार नाही. मग ग्रॅनाईट निवडला गेला. लाल व काळ्या रंगातील ग्रॅनाईट, जो जवळपास उपलब्ध असेल, तो शिलेवर नेण्याची व्यवस्था, त्यासाठी जेट्टी उभारली गेली. प्रत्यक्ष दगडकटाईचे काम ६ नोव्हेंबर १९६४ ला सुरु झाले. प्रत्यक्ष शिलेवर बांधकाम १२ ऑक्टोबर ६७ पासून सुरू झाले.

सुरुवातीला मूळ खर्चाचा अंदाज ६ लाख होता, तो वाढत नंतर ६० लाख, मग ८० लाख तर प्रत्यक्षात १ कोटी ३५ लाखापर्यंत पोहोचला. शिलास्मारका व्यतिरिक्त ध्यानमंडप, श्रीपादमंडपही उभारले गेले. पैसा उभा करणे मोठे आव्हान होते. एकनाथजींमधील सर्व कौशल्य, प्रतिभा, सर्जनात्मकता, संघटन, व्यवस्थापकीय कौशल्य, संयम, धैर्य गुणांना हे एक आव्हानच होते. आपल्या धीर-वीर-गंभीर व्यक्तिमत्वाचा कस त्यांना लावायला लागला होता.

निधीसंकलन करतांना प्रत्येक राज्य, केंद्र सरकार, अनेक संस्था, उद्योगपती यांच्यासोबतच एकनाथजींनी भारतातल्या सर्वसामान्य नागरिकांनाही साद घातली. या स्मारकाशी भारतीय कसे जोडले जातील हा विचार त्यांनी केला. निधी संकलनाचा मूळ उद्देश्य राष्ट्रजागृती होता. राज्या-राज्यात निधीसंकल्पनासाठी समित्या नेमल्या गेल्या. त्या त्या राज्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रभावी व्यक्तींचा सहभाग त्यात होता. अत्यंत

आकर्षक देणगीपत्रके तयार केली. १ रु., ३ रु., ५रु. किंमतीच्या पत्रकाआधारे त्यावेळच्या भारताच्या लोकसंख्येच्या १% नागरिकांकडून म्हणजे ३० लाख लोकांकडून ८५ लाख रु. जमा झाले. १९६५ चा भारत-पाक युद्धाचा तो काळ होता. दुष्काळासारख्या अनेक समस्या होत्या, तरीही लोक या निधीसंकलन मोहीमेत हिरीरीने सहभागी झाले. महत्वाचे म्हणजे केवळ ३-४ महिन्यांमध्ये निधीसंकलनाचे हिशोबही पूर्ण केले गेले. एखाद्या राष्ट्रहिताच्या कामात, लोकसहभाग, लोकसंपर्काच्या माध्यमातून कसा साधावा याचा हा वस्तुपाठच होता.

विवेकानंदाचा पुतळा कसा असावा, याबाबतही एकनाथजींची दूरदृष्टी जाणवते. विवेकानंद ध्यानस्थ नव्हते तर एक पाऊल पुढे टाकून राष्ट्र जागरणासाठी सज्ज आहेत. लोकांना गतिमान कार्यप्रवृत्त करत आहेत. त्यांना ज्या देवी कन्याकुमारीच्या कृपेने जीवितध्येय गवसले, त्या श्रीपादशिलेवर त्यांची नजर नत आहे, पुतळ्याचा आकार, भाव त्यासाठी वापरलेला दगड या सर्वांचा विचार उभारणीच्या वेळी केला गेला.

संपूर्ण स्मारकाचा केंद्रबिंदू श्रीपद्म आहे. श्रीमद्मच्या स्थानानुसार बाकीची रचना करण्यांत आली आहे. हे सर्वांगसुंदर स्मारक विक्रमी वेळांत पूर्ण करण्यांत आले. १९७० पूर्वी बांधकाम पूर्ण करावयाचे याबाबत एकनाथजी ठाम होते. स्मारकाच्या बांधकामाचे वेळापत्रक तयार करण्यांत आले होते व त्यानुसार ते पूर्ण होत आहे हे एकनाथजी काटेकोरपणे पहात असत.

स्वतः एकनाथजींनी स्मारकाच्या निर्मितीसाठी अथक परिश्रम केले व इतरांनाही परिश्रम घ्यायला लावले. १९६४ ते १९७० या सहा वर्षात सर्वजण कामाने झपाटले होते. या काळात अनेक सामान्यांनी असामान्य काम करून दाखविले. सर्व कामगारांना अपघात व घातपातापासून वाचविण्याकरिता विमा उतरविला होता. सुदैवाने एकही अपघात झाला नाही. या प्रचंड स्मारकाच्या निर्मितीसाठी सहा हजार टन दगड कोरीव कामासाठी वापरले गेले. त्यांची संख्या ७३,१५५ होती. २०८१ दिवस सतत काम सुरु होते. ज्यामध्ये दररोज सरासरी ६५० लोक काम करत असत. एकूण ७, ८३, ७६७ मनुष्य तास स्मारकासाठी खचे झाले.

स्मारकाचे लोकार्पणही वैशिष्ट्य पूर्ण होते. या स्मारकाशी संपूर्ण देश जोडला गेलेला असल्याने उद्घाटनालाही अनेक जणांना बोलवायचे होते. उद्घाटन सोहळा २ महिने चालला होता. देशाच्या विविध भागातील जनतेसाठी विशिष्ट तारखा निश्चित केल्या होत्या. सात हजाराची वस्ती असलेल्या गावात लोकांची योग्य सोय ठेवता यावी म्हणून रोज ५००० पेक्षा आधिकजण भेट देणारे असू नयेत ही खबरदारी घेतली गेली होती.

रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी वीरेश्वरानंद यांच्या हस्ते शिलान्यास तर उद्घाटन भाद्रपद शुक्ल द्वितीयेला म्हणजे २ सप्टेंबर १९७० ला भारताचे तत्कालीन राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते करण्यात

आले. तामिळनाडूचे तत्कालीन मुख्यमंत्री एम. करुणानिधी अध्यक्षस्थानी होते. १८९३ साली याच तिथीला स्वामीजींनी शिकागो धर्मपरिषदेत साऱ्या विश्वाला संबोधित केले होते.

एकनाथजींची दूरदृष्टी, संघटन कौशल्य, निरहंकारिता, परिपूर्णता याला तोड नाही. 'विवेकानंद शिलास्मारक एकनाथजींच्या अप्रतिम सौंदर्यसृष्टीचे त्यांच्यामधील उपजत गुणांचे, दुर्मिळ क्षमतांचे चिरकालीन स्मारक आहे. एवढे सारे गुण एका व्यक्तीत एकवटलेले क्वचितच दिसतात.' डॉ. श्री. भा. वर्णेकर म्हणाले होते.

एकनाथजींना केवळ हे दगडविटांचे स्मारक उभे करायचे नव्हते तर स्वामीजींच्या विचारांचे जिवंत स्मारक उभे करायचे होते. त्यादृष्टीनी पूर्व तयारी या काळातही सुरु होती. 'इंडियाज् कॉन्ट्रिब्युशन टू वर्ल्ड थॉट ॲन्ड कल्चर' या नावाचा अत्यंत मौलिक व माहितीपूर्ण असा ८०० पानांचा ग्रंथ यानिमित्ताने प्रकाशित केला. या ग्रंथासाठी जगभरातील नामांकित विद्वानांनी लेख लिहिले. ज्याच्या १०,००० प्रती काढल्या. त्याकाळी त्याची किंमत १५०/- ठेवली. ज्यातून दुसऱ्या टप्प्यातील महत्वाचा प्रकल्प 'विवेकानंद केंद्र' निर्मिती केली गेली. स्वामीजींना अपेक्षित असे सेवाभावी, उदार हृदयी, देशसेवेची आस असणारे 'जीवनप्रती' असणारे शेकडो युवक युवती प्रशिक्षित करण्याचे काम सुरु झाले. विवेकानंद केंद्राच्या कार्याचे हे जीवनव्रती कणा ठरते. आज या अध्यात्म प्रेरित सेवा संघटनेच्या भारतात १००५ ठिकाणी शाखा आहेत. ईशान्य भारत, अंदमान निकोबार, तामिळनाडू, महाराष्ट्र येथे अनेक प्रकल्प सुरु आहेत. केंद्र विद्यालये, आनंदालये, सित्रयांसाठी व्यावसायिक शिक्षण देणारी केंद्र, रुगणालये अमृत सुरभी प्रकल्प यांद्वारे समाजातील अनेक घटकांसाठी काम सुरू आहे. याशिवाय अनेक ग्रामीण विकास प्रकल्प, वेदांचे अध्ययन, प्राचीन विद्या संरक्षण उद्देश्याने गुरुकुलांचे संचालन, नैसर्गिक साधनसंपत्ती विकास प्रकल्प, उत्तर-पूर्व क्षेत्रात जनजातींच्या जीवनपद्धतींचा अभ्यास शिवाय प्रशिक्षण केंद्र इ. अनेक गोष्टी केंद्र करत आहे. प्रकाशन संस्थेच्या माध्यमांतून विवेकानंद केंद्राच्या पत्रिकांचे प्रकाशन तसेच विवेकानंद विचारांवरील साहित्याची निर्मिती व विक्री सुरु असते.

'मनुष्य निर्माणातून राष्ट्रोत्थान', मानवसेवा हीच माधवसेवा. जीवभावे शिवसेवा हे मिशन समोर ठेवून एकनाथजींनी लावलेल्या वृक्षाचा आज वटवृक्ष नव्हे तर कल्पवृक्ष झाल्याचे दिसते.

शिलास्मारकाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त स्मारकाला जरुर भेट देऊ या व कायम उर्जेचा स्त्रोत ठरलेल्या या स्मारकातून राष्ट्रोत्थानाची प्रेरणा घेऊ या.

(संदर्भ पुस्तके : १. कथा विवेकानंद शिलास्मारकाची.

२. एकनाथजी ले. निवेदिता भिडे, अनु. सुनीता करकरे.)

**– सौ. संध्या टेंबे**

याचना करणे, दुसऱ्याकडे काहीतरी मागणे हे कमीपणा देणारे आहे यात काही शंकाच नाही व कदाचित म्हणूनच असे असेल की याचकाचा हात खाली व दात्याचा हात वर अशी स्थिती असते. पुढील सुभाषितात हेच सांगितले आहे...

तावन्महतां महती यावत्किमपिहि
न याचते लोक: ।
बलिमनुयाचनसमये श्रीपतिरपि वामनो जात:।।

अर्थ... जोपर्यंत कोणाकडे काही मागत नाही तोपर्यंतच थोरांचा थोरपणा! बलि राजाकडे याचक म्हणून जाताना भगवान श्री विष्णूंनासुद्धा वामनाचे रूप धारण कपावे लागले. ( वामन=लहान,ठेंगू, बुटका )

आता यामागची कथा...

विष्णुभक्त प्रल्हादाचा नातू, राजा बळी/बलि नावाप्रमाणेच बलशाली, चक्रवर्ती सम्राट होता.

स्वपराक्रमाने त्याने सर्व देवांना सळो की पळो करून टाकले होते. कित्येकांचे सर्वस्व हिरावून घेतले होते. माझ्यापुढे देवांचे काहीही चालणार नाही, असा आपल्या पराक्रमाचा गर्व त्याला झाला होता. पराक्रमाबरोबरच तो दानशूरपणासाठीही प्रसिद्ध होता. सारे देव त्याच्या पराक्रमापुढे हतबल झाले होते. अनन्य भावाने ते भगवान विष्णूंना शरण गेले. आमचे वैभव, साम्राज्य,सत्ता आम्हाला परत मिळवून द्या अशी विनवणी सर्वांनी विष्णुदेवांना केली. भगवान् विष्णूंनाही त्यांची दया आली. देवांची मागणी पूर्ण करावी असे त्यांनी ठरविले. त्याकरिता राजा बलीकडे जायचे ठरविले. तशी संधीही त्यांना लवकरच प्राप्त झाली.

बलि/बळी राजाने एक यज्ञ आरंभिला होता. यज्ञात दानधर्म तर होतोच! भगवान् विष्णूंनी बटूचे/वामन रूप घेऊन ते यज्ञभूमीत उपस्थित झाले. तेथे आपल्या विद्वत्तेने सर्व उपस्थित मंडळींना चकित केले. राजाही संतुष्ट झाला. ब्रह्मन् आपणास काय द्यावे / आपणास काय हवे ते नि:संकोचपणे सांगावे.

बटू रूपातील वामनाने म्हटले, राजन्, मला मोठी दक्षिणा नको. सोने-चांदी नको, धन दौलत नको. गायी-घोडे-हत्ती आदि पशुधन नको. त्यावर नम्रपणे राजाने पुन्हा विचारले... पण मग आपल्याला हवे तरी काय? वामन म्हणाला, राजन् देणार असशीलच तर त्रिपाद भूमि दे! तीही संकल्प पूर्वक! राजाने दानाचे उदक सोडण्याकरिता झारी आणविली.

हे सारे दरबारात असलेले दैत्यगुरु शुक्राचार्य बघत होते, ऐकत होते. त्यांनी राजास हे चमत्कारिक दान देण्यापासून परावृत्त करण्याचा यत्न केला. राजा काही तयार होईना. मग शुक्राचार्य सूक्ष्म रूप धारण करून पाणी बाहेर येण्याच्या जागी जाऊन बसले.

राजाने संकल्प केला. उदक सोडण्याकरिता झारी तिरपी केली. पण झारीतून उदक येईना! वामनाने त्या झारीतून आत जाईल अशी एक शलाका हाती घेऊन ती उदक बाहेर येण्याच्या जागेत सारली. परिणामत: तेथे असलेल्या शुक्राचार्यांच्या डोळ्यात गेली. डोळा फुटला. वेदनेने व्याकूळ झालेले शुक्राचार्य बाजूला झाले. उदक बाहेर आले. संकल्प पूर्ण झाला.

आता वामनाने बटूचे रूप सोडून विराटरूप धारण केले. पहिल्या पावलात सारी पृथ्वी अक्षरशः पादाक्रान्त केली. दुसऱ्या पावलात सारा स्वर्गलोक व्यापून टाकला व राजला विचारले राजन तिसरे पाऊल कोठे ठेवावे? निरुपायाने स्ववचन पूर्तीकरिता मूलत: वामनरूप घेऊन आलेल्या भगवान् विष्णूंसमोर नतमस्तक होऊन राजा म्हणाला... महात्मन तिसरे पाऊल माझ्या मस्तकावर ठेवावे. वामन रूपातील विष्णूंनी राजाच्या मस्तकावर पाय ठेवून त्याला पाताळात लोटून टाकले. अशा रीतीने बलिराजाचे गर्वहरण करून चिन्ताग्रस्त देवांना चिन्तामुक्त केले.

पण त्यासाठी भगवान विष्णूंना काय करावे लागले? वामन रूप घेऊन राजाकडे याचना करावी लागली. म्हणूनच सुभषितात म्हटले आहे...

बलिमनुयाचनसमये
श्रीपतिरपि वामनो जात: ।।

**श्रीकांत अनंत बर्वे**

•••

## एकनाथजी रानडे संघातील एक नररत्न

एकनाथजी रानडे यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९१४ चा, लहानपणापासून संघसंस्कार, डॉ. हेडगेवारांच्या 'कुशपथका' मधील समर्पित व्यक्तिमत्व. तत्वज्ञानात बी. ए. ऑनर्स, संघप्रचारक म्हणून महाकोशल प्रांताचे प्रचारक, नंतर पूर्वांचलमध्ये प्रचारक. प्रांतप्रचारक, क्षेत्रप्रचारक, अखिल भारतीय बौद्धिक प्रमुख आणि १९५६ ते १९६२ संघाचे सरकार्यवाह. महाविद्यालयीन जीवनापासून 'विवेकानंद विचारांचा' प्रभाव १९६२ साली विवेकानंद जन्मशताब्दी वर्षात विवेकानंद वाङ्मयाचा धांडोळा घेऊन 'राऊझिंग कॉल टू हिंदू नेशन' विवेकानंद विचारांचे सुंदर संकलन केले. ज्या पुस्तकाच्या १७ भाषांमध्ये अनुवाद प्रसिद्ध झाला, 'हिंदू तेजा जाग रे' मराठीत आले.

१९४८, १९७५ संघ बंदीकाळात उत्तम संघटनात्मक काम केले. १९४८ ची संघबंदी उठावी यासाठी वल्लभभाई पटेलांच्या मागणीवरून संघाची लिखित घटना, ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या मदतीने तयार केली.

१९६३ मध्ये विवेकानंद शिलास्मारकाची जबाबदारी स्वीकारल्यावर, सव्यसाची वृत्तीने अत्यंत अवघड आव्हानात्मक काम, कलात्मक दृष्ट्या व नियोजनबद्ध रीतीने वेळेत पूर्ण केले. एवढेच नव्हे तर 'एक जीवन एक ध्येय' या विचारानुरुप विवेकानंदांना अपेक्षित अशी अध्यात्मप्रेरित युवक-युवतींची सेवाभावी संघटना उभी केली. महत्त्वाचे हे की सर्व कार्य 'कमलपत्रवत्' निरपेक्ष, निरहंकारी वृत्तीने केले.

**– सौ. संध्या टेंबे**

## ''अर्धनारी नटेश्वर देवाधिदेव महादेव स्वरुप वर्णन''

**वसंत गोडबोले**

''नमः शिभ्यां नवयौवनाभ्यां परस्पराश्लिष्टवपुर्धराभ्याम्।
नगेन्द्रकन्या - वृषकेतनाभ्यां नमो नमः शंकरपार्वतीभ्याम्।।''

अर्थ : ''कल्याण करणाऱ्या नवयौवनयुक्त, परस्परआलिंगित शरीर असलेल्याला नमस्कार. वृषभचिन्ह ज्याच्या ध्वजावर आहे अशा शंकराला व पर्वतकन्येला वारंवार नमस्कार.''

श्रीमहादेवांची उपासना आसेतु हिमाचल या भारतात अनादि कालापासून सुरु आहे. भगवान शंकरांना भारतीय जनजीवनात अनन्य साधारण महत्व आहे. भगवान शंकरांची पूजास्थाने शिवालये भारतात सर्वत्र आढळतात. शिवपुराण तसेच अन्य शिवउपासना ग्रंथ, स्तोत्रे, शिवोपासकांमध्ये प्रचलित आहेत. शंकर या शब्दाचा अर्थच 'शं करोति इति शंकरा' म्हणजे शुभ करणारा तो शंकर - शं म्हणजे शुभ असा आहे. त्या भगवान शंकरास अनेक नावांनी संबोधिले जाते. सदाशिव, अर्धनारीनटेश्वर, देवाधिदेव महादेव, शंकर, पशुपतीनाथ इ. त्यांना सृष्टीलयकर्ता संबोधिले जाते. त्यांचा महामृत्युंजय मंत्र तसेच ॐ नमः शिवाय हा मंत्र व बारा ज्योर्तिलिंगाचा श्लोक प्रसिद्ध आहेत. शंकरांचे प्रतिक म्हणून शिवलिंग / शिवपिंडीचे पूजन केले जाते. शिवमंदिरातही शिवपिंडीच असतात.

भगवान शंकरांचे वर्णन असे करता येईल की ज्ञानगंगा मस्तकातून ज्याच्या वहाते, जे चारित्र्याचे उज्ज्वल शिखराधिष्ठित आहेत, उत्तुंग व धवल अशा शिखरावर विराजमान आहेत, साधेपणा हाच त्यांना शृंगार आहे, विभूती हेच वैभव, सृजनरक्षण व खलनिर्दालन हे व्रत आहे, प्रेम हा स्थायीभाव, जगरक्षणासाठी हलाहल प्राशन करणारे, जगरक्षणहितैषीपणा ही ज्यांची कल्याणवृत्ती, बालेन्दुला मस्तकी धारण करून खऱ्या कर्मयोग्यास मान देणारा, कल्याण व ज्ञान यांचे साक्षात मूर्तीमंत रुप असणाऱ्या, संहारासाठी त्रिशूळ व संगीतासाठी डमरू धारण करून संहार व संगीत बाळगणाऱ्या, मृत्यु भयानक घटना नाही याचे ज्ञान देण्यास स्मशानवास करणारा व मृत्यु म्हणजे जीवाचे शिवभेटीस जाणे हे याद्वारे सूचित करणाऱ्या भगवान शंकरास अनंतकोटी प्रणाम.

महादेवाचे प्रतिकात्मक रुपाचे वर्णन करणेसाठी हा लेख असल्याने या प्रास्ताविकानंतर त्यास प्रारंभ करून त्या रुपाचे वर्णन म्हणजे भावार्थ विशद करण्याचा अल्पमतीने प्रयत्न करतो.

शिवशंकराची उपासना दोन प्रकारे करतात. १) शिवलिंग २) शिवमूर्ती

शिवलिंग हे अव्यक्ताचे मूर्त प्रतीक आहे. बहुतेक शिवमंदिरात शिवलिंगाचीच

पूजा होते. पूजेतील ही शिवलिंगे दोन प्रकारची असतात. १) मानवनिर्मित २) प्राकृतिक/नैसर्गिक-जसे अमरनाथ येथे गुहेत तयार होणारे बर्फाचे शिवलिंग. तसेच अनेक ठिकाणी शिवमंदिरातील शिवलिंग पृथ्वीतून वर आलेले स्वयंभू असे सांगतात. तसेच काही ठिकाणी प्रत्यक्ष शंकरानेच दिलेले शिवलिंग आहे असे सांगितले जाते. जसे गोकर्ण महाबळेश्वर, रामेश्वर इ. केदारनाथ व पशुपतीनाथ नेपाळ येथे तर शिवशंकराचे वृषभरुपातील अवयव म्हणजे अनुक्रमे वशिंड व मुख शिवपूजेचे मूर्तीरुप मानतात. प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगेही अशाच प्रकारे स्वयंभू व जागृत मानतात. अर्थात याला ऐतिहासिक पुरावे नाहीत तर पुराणे व लोककथा परंपरागत चालत आलेल्या यावरच विश्वास जनतेचा आहे. हा श्रद्धेचा प्रश्न आहे त्यामुळे त्यावर अधिक भाष्य न करणेच बरे. या प्रसिद्ध द्वादश ज्योतिर्लिगांपैकी प्रत्येक ज्योतिर्लिंगाचे स्थान महात्म्य, उत्पत्ती यावर पौराणिक पोथ्या इ. साहित्यही प्रसिद्ध असून प्रत्येकाचे जनमानसांत अढळस्थान आहे व श्रद्धेने त्यांचे पूजन, यात्रा इ. केली जाते. इतरही शिवलिंगस्थाने त्या त्या परीने अश्याच कथा व लोकश्रद्धा यामुळे जनमानसात स्थान मिळवून आहेत.

शिवलिंगाचे जनमानसात, आध्यात्मिक लोकात व शिवभक्तात मान्य प्रतिक अर्थ असे आहेत.

अ) शिवलिंगाचा अण्डाकार ब्रह्माण्डाचे प्रतिक आहे.

ब) शिवलिंग आत्म्याचे प्रतिक आहे.

क) शिवलिंग हे जीव व शिव यांचे एकीकरणाचे प्रतिक आहे.

ड) शिवलिंग हे निराकार शिवाचे प्रतिक आहे जे शांकर अद्वैत दर्शनच्या 'ब्रह्म' समान व तुल्य आहे. (येथे ब्रह्म म्हणजे ब्रह्मा वा ब्रह्मदेव नाही तर परब्रह्म असा अर्थ आहे हे लक्षात घ्यावे). हे शिवाचे विशुद्ध रुप आहे याचे शब्दात वर्णन शक्य नाही कारण ते शब्दातीत आहे. हे अनुभव/अनुभूती देणारे अनुभूतीगम्य आहे. ज्या योग्यांना याची प्रचिती/अनुभूती आली त्यांनी परमानंदानुभूतीचे संकेत दिले आहेत. हे ब्रह्माण्डाचे सत्तेचे परम कारण आहे.

शिवसंप्रदायातील बसवेश्वरांचे वीरशैव वा लिंगायत संप्रदायाचे हे वैशिष्ट्य आहे की त्यासंप्रदायात शिवपूजा केवळ शिवलिंग रुपातच होते व या संप्रदायाचे अनुयायी नेहमी इष्टलिंग धारण करतात शरीरावर. कोणी गळ्यात तर कोणी कमरेला धारण करतात हे इष्टलिंग.

हे शिवलिंग काही मंदिरात चार मुखी असते यालाच पंचमुखी शंकर म्हणतात. चार दिशांना चार व मध्यभागी एक हे अदृश्य म्हणून नसते. चार मुखे चार दिशा दाखवतात व पाचवे अदृश्य असल्याने साकार रुपात नसते. ते अदृश्य समजायचे असते. पंचमुखी शिव हे अनन्त शिवाचेच एक रुप आहे.

पुराणांमध्ये शिवलिंगाची विभिन्नता वर्णन केली आहे. त्यानुसार ब्राह्मणांनी पारद

लिंग (रस-पारद म्हणजे पाऱ्याचे बनविलेले), क्षत्रियांकरता बाण, वैश्यांकरता सुवर्णाचे व अन्यांकरता शिळेचे म्हणजे पाषाणाचे लिंग पूजेसाठी वापरावे असे प्रतिपादन केले आहे. स्त्रियांकरिता पार्थीव व विधवांसाठी पाऱ्याचे व जे पुरुष जीवनाचा उर्वरित काळ धर्मपालनात व्यतीत करतात त्यांनी स्फटिकाचे शिवलिंग पूजेसाठी वापरावे हे उत्तम असे सांगितले आहे. या लिंगांचा पूजेनंतर प्रसादही ग्रहण योग्य असतो.

बाणलिंगाचे वैशिष्ट असे आहे की ते नर्मदाजलातीलच असावे व तेथूनच म्हणजे नर्मदा नदीपात्रातूनच मिळालेले वा काढलेले असावे. जो बाण पाच वेळा तराजूत तोलल्यानंतरही समान होत नाही तेच बाणलिंग सर्वोत्तम समजतात. पाषाणातून बनवलेले लिंग तलावात सोडून देऊन जर तेच पुन्हा मिळाले तर ते लिंग बाणलिंग स्वरुप होते. कलियुगात पार्थिवेवर लिंगाचे पूजेचे मोठे महत्व आहे. आपल्या मनिषा प्रगट करून विधीपूर्वक पार्थिवेश्वर लिंगाची पूजा करण्याने सर्व मनोकामना पूर्ण होतात. शैव अनुयायांना कमळतंतू (कमळपराग), फूलांचे पराग, मोती, चांदी, सोने, पारा यांचे तसेच पार्थिव (मातीचे) शिवलिंग करून त्याची पूजा करण्यास पुराणात सांगितले आहे.

नर्मदा नदी ही शिवपुत्री समजली जाते. त्यामुळे नर्मदेतील प्रत्येग दगड शंकर म्हणूनच मानतात. तसेच तिच्यात सापडणारे लाल दगड/खडे गणपती म्हणून पूजतात. नर्मदेचे नाभी स्थान नेमावर असून श्रीतीर्थ धारा योनी स्थान आहे. हे श्रीधारा धावडी गावाजवळ (मूळ गाव धायरी) असून धावरीकुंड म्हणतात - याचे वैशिष्ट्य म्हणजे या कुंडात स्वयंभू शिवलिंगे निघतात त्यांना बाणलिंगे म्हणतात. श्री बाणलिंगे नर्मदेतील दगडावर पाणी घातले असता ते अमृतमय होते असे पुराणप्रमाण आहे. तसेच नर्मदेतील प्रत्येक शिलाखंड शिवस्वरुप आहे म्हणून 'नर्मदाका कंकर वही है शंकर' असे म्हणतात तस पुराणातही उल्लेख आहे. साधा पाषाणही अमृतमय व शिवस्वरुप तर प्रत्यक्ष बाणलिंगांचा महिमा काय वर्णावा. भगवान शंकरांनी त्रिपुरासुराचा वध केल्यावर बाणासुराच्या देहाचा दाह अतिशय होऊ लागला व त्याने शिवलिंगार्चना करून शिवप्रसन्न झाल्यावर वर मागितला.

''त्व प्रसादान्महादेव मा मे लिंग प्रणश्यतु।
गृहणभ्द्रिः पश्याभत्तया बाणलिंग परंपराः।।

तेव्हापासून नर्मदेतील शिवलिंगांस बाणलिंग (बाणलिंग) म्हणतात. धावरी कुंडातील लिंगे विशेष समजतात. या धावरी कुंडात नर्मदेचा प्रपात ५०-६० फूटावरून पडतो. प्रवाहातून जे दगड वाहात येतात त्यातील ज्यांत चैतन्य असेल तेच दगड कुंडात पडून भोवऱ्याचे घर्षणाने गोलाकर होतात. ही लिंगे कुंडात ५०-६० फूट खोलात मिळतात परंतु नर्मदेच्छा. धावरी कुंडात विचित्रवर्णी, लहान मोठे बाण मिळतात. त्यांत कर्पूरेश्वर, अमृतेश्वर, केदारेश्वर, लोहीतेश्वर, चंद्रशेखर, चंद्रमौलिश्वर, निलकंठ, त्रिजटेश्वर, नागेश्वर, नंदिकेश्वर, अर्धनारी नटेश्वर, उमामहेश्वर, भस्मांगशिव इ. बाण विशेष समजतात.

निराकार परमेश्वराचे साकार रुप म्हणजेच बाणलिंग सूक्ष्मागमात म्हटले आहे.

''लिंगे संपूजिते तस्मिन् पूजिताः सर्व देवतम्।।''

नर्मदा किनारी स्वयं प्रकट झालेली श्री महादेवाची २८ लिंगे आहेत ती या स्वयंभू शिवलींग या निमित्त्याने माहितीसाठी अशा करता देत आहे. नर्मदा शिवकन्या असल्याने जेथे नर्मदा तेथे शंकर हे सिद्ध आहे. (तिच्या उत्तर तटाला त्रिपुरी या तीर्थाक्षेत्री १०८ स्वयंभू शिवलिंगे आहेत).

२८ लिंगे येणेप्रमाणे - स्थानेश्वर, महादेव, शूलपाणी अपरसत्येश्वर, कल्पेश, हिरण्य, जातवेदा, प्रजापत्य, सिद्धनाथ, शशांकनयन, अनुकेश, स्कन्द, आश्विन, तेजस, ब्रम्हेश्वर, अग्निगर्भ, श्रीकण्ठ, त्र्यंबक, उमापति, नीलकण्ठ, खटवाङ्ग, महाकाल, घटेश्वर, त्रिलोचन, देवदेव, महेश्वर, अनंगलिङ्ग, कामदेवलिङ्ग, सिद्धमन्वंतरलिङ्ग.

शिवमूर्तीः - शिवमूर्ती विविध रुपात व विविध प्रकारात असते. अनेक पुरातत्व संशोधक व अभ्यासू विद्वानांनी यावर बरेच संशोधन करून त्या विविध रुप व प्रकारातील मूर्तीचे विश्लेषण व मिमांसा केली आहे. मूर्तीकलेच्या दृष्टिकोनातून पाहिले असता मंदिरात खालील प्रकारच्या शिवमूर्ती अधिक प्रमाणात आढळतात. त्या मूर्तीचे वैशिष्ट्य संक्षेपात देत आहे या लेखात. या प्रकारांशिवायही अनेक प्रकारच्या शिवमूर्ती वेगवेगळ्या शिवमंदिरात आहेत त्या विविध कलाकार/ शिल्कारांचे प्रतिक्षेनुसार तसेच काही शिवलीलांवरून केलेल्या आहेत. त्यांची मान्यता त्या त्या स्थानापुरतीच मर्यादित असून त्यांचे महात्म्य फारसे प्रसिद्ध नाही. कोठेही स्वयंभू शिवमूर्ती असल्याचे माझे ऐकिवात व वाचनात नाही.

अ) दक्षिणामूर्ति : ही मूर्ती चतुर्भुज असते. या मूर्तीत त्रिशूल, डमरु, सर्प, चंद्र, जटाभार. गंगा आदि शिव वैशिष्ट्ये दाखविलेली असतात.

ब) अर्ध-नारीश्वरमूर्ती : मूर्तीच्या डाव्या भागात शिव त्रिशूल, कमंडलु, सर्प, जटाभार नर-कपाल आदि असतात.

क) नटराज मूर्ति - शिव- तांडव नृत्य प्रदर्शित करणारी ही मूर्ति - यात शिवशंकराचे नटराज रुप अंकित केले असते. नृत्यकलेची देवता म्हणजे नट व राज म्हणजे भगवान म्हणून नटराज. यात शिवरुप चतुर्भुज असते व ते खालील वैशिष्टे दाखविते.

१) उजव्या (वर केलेल्या) हातात डमरु २) डाव्या (वर केलेल्या) हातात अग्नि ३) (खाली केलेल्या) उजवा हात अभय मुद्रा ४) डावा (खाली केलेला) हात वर उचललेल्या पायाकडे संकेत करणारा ५) उजव्या पायाखाली अपस्मार असूर वा दैत्य दाबलेला ६) डावा पाय हत्तीच्या पायाची आकृति रुपात समोर उचललेला ७) चारी दिशांना /सर्वत्र गोल अग्निवलय / अग्निज्वाळा ८) जटाभार/ केस विखुरलेले मुक्त उडणारे.

या नटराज शिवाचे मुख्य मंदिर

तामिळनाडूत चिद्म्बरम येथे आहे. दक्षिण भारतातील इतर शिवमंदिरात मुख्य लिंग मंदिर वा शंकरांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या मूर्ती आहेत ज्यांच्या आजूबाजूस बहुतेकदा एक नटराज मंदिर वा नटराजाचे चित्र असतेच.

(लेखाचा उर्वरित भाग पुढील अंकी...)

**वसंत गोडबोले**

●●●

(पृष्ठ क्र.१७ वरून ...... '**प्रपंच**')

न मानता, उलट प्रपंच म्हणजे परमार्थ साधण्याचे मोठेच साधन आहे, व तेच आपल्याला प्राप्त झाले आहे असे मानून, संतांनी सांगितलेल्या योग-युक्तीने, संसारात चालून आलेली कर्तव्य कर्मे करत असताना परमार्थ कसा साधता येतो याचा अभ्यास करावा.

गृहस्थीने त्याप्रमाणे योगयुक्तीने संसार केल्यास त्याचा प्रपंच तर उत्तम होईलच पण त्याचबरोबर परमार्थ मार्गावरही उत्तम प्रगती साधली जाऊन त्याच्या आयुष्याचे (जीवनाचे) खऱ्या अर्थाने सार्थक होईल.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

●●●

(पृष्ठ क्र.९ वरून...''**पूर्णावतार भगवान श्रीकृष्णांची युद्धनीति**'')

म्हणूनच श्रीकृष्ण हे उत्तम योजक, युद्धनीतिशास्त्र निपुण होते हे वरील उदाहरणाने स्पष्ट होईल.

माझ्या लेखात न्यूनत्व असेल तर ते माझे अज्ञान. क्षमस्व. सूज्ञ वाचकांनी त्रुटी अवश्य दाखवाव्यात म्हणजे मला सुधारणा करता येतील.

भगवान श्रीकृष्णांनी 'श्रीमद्भगवद्गीता' सांगून एक अक्षय तत्वज्ञान दिले आहे मानवजातीला. कोण क्षम्य, कोण वध्य, काय योग्य, काय अयोग्य इ. सर्व त्यांनी युद्धनीतित वापरले. शत्रूमर्मस्थान, बलस्थान अचूक हेरणारी व त्याप्रमाणे प्रत्याघात करणारी ही युद्धनीति होती. शिवाय त्यांचे इतरही अनेक दैवी गुण होते. म्हणूनच त्यांना पूर्णावतार म्हणतात.

हा लेख त्यांचे चरणकमळी भक्तीभावाने अर्पण करतो व आपल्या सर्वांवर त्यांनी कृपा दृष्टी करावी व गीतेत सांगितल्याप्रमाणे 'यदा यदा... संभवामी युगे युगे' असा अवतार घ्यावा ही प्रार्थना करतो.

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३
Email : vasantgod@gmail.com

●●●

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

म्हणजे अज्ञान नाश हे गीतेचे मुख्य उदिद्ष्ट त्यांनी मानले. अर्जुनाला युद्धास प्रवृत्त करणे हा उद्देश गृहीत धरून केलेला कर्मयोगाचाच उपदेश गीतेत आहे, हा टिळकांचा दृष्टिकोन विनोबांनी स्वीकारला नाही. विनोबांनी निष्काम कर्मयोग मान्य केला.

विनोबांच्या पुस्तकांच्या शीर्षकांकडे केवळ दृष्टी जरी फिरवली तरी त्यांच्या व्यापक व्यासंगाचा आवाका लक्षात आल्यावाचून राहत नाही. जवळ जवळ २२ भाषा त्यांनी अवगत केल्या होत्या. सतत अध्ययनात रमत राहणारा हा महान संत समर्थांची

दिसामाजी काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडीत वाचित जावे।।

ही शिकवण तंतोतंत पाळताना दिसतो. त्यांनी खालील ग्रंथ लिहिले.

अष्टादर्शी, ईशावास्यवृत्ति, उपनिषदांचा अभ्यास, गीताई, गीताई-चिंतनिका, गीताप्रवचने, गुरुबोध सार, जीवनदृष्टी, भागवतधर्म सार, मधुकर, मनुशासनम्, लोकनीती, विचारपोथी, साम्यसूत्रवृत्ति, साम्यसुत्रे, स्थितप्रज्ञ दर्शन इत्यादी.

विनोबांनी केवळ हिंदुधर्माचाच अभ्यास केला असे नाही. कुराण, बायबल व गुरुग्रंथसाहिब या धर्मग्रंथांचा मूळातून अभ्यास करून त्यांचे सार सांगणारे ग्रंथ सिद्ध केले.

'विनोबाः सारस्वत' या साहित्य अकादमीने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ज्येष्ठ साहित्यिक राम शेवाळकर विनोबांच्या लोकमान्य टिळकांशी झालेल्या भेटीचा वृत्तांत कथन करतात. ६ मार्च १९१७ रोजी पुण्याला जावून विनोबा टिळकांना भेटून आले. लोकमान्यांना त्यांनी तीन प्रश्न विचारले.

१) तुम्ही संपूर्णपणे निर्भय झाला आहात काय?

२) कबीराचा बीजक हा वेदांतावरील ग्रंथ तुम्ही वाचला आहे काय?

३) मोक्षप्राप्ती ज्ञानाने होईल असे आपणांस वाटते काय?

पहिल्या दोन प्रश्नांच्या उत्तरी त्या महापुरुषाने विनोबांकडे केवळ पाहिले. त्या पाहण्यात विनोबांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळून गेली. तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरात टिळक म्हणाले, 'होय ज्ञानाने मोक्ष मिळू शकेल पण ज्ञानी लोकसंग्रहासाठी कर्म करील'.

विनोबांचा निदिध्यास कोणता होता, हे ह्या प्रसंगावरुन लक्षात यायला हरकत नाही.

सर्व विनोबा वाङ्मयामधून उपनिषदांचा अभ्यास, स्थितप्रज्ञदर्शन, स्वराज्यशाळा व गीताई चिंतनिका या चार पुस्तकांचे स्थान वेगळे आहे. उपनिषदांच्या अभ्यासाचा हा केवळ प्रस्तावना खंड आहे. इतर अभ्यास पुढे केव्हा तरी पूर्ण करण्याचा विनोबांचा संकल्प होता. या त्यांच्या संकल्पाच्या पूर्तीच्या दिशेने होणारा एक लहानसा प्रयत्न ईशावास्योपनिषदाच्या विवरणाच्या रुपाने

उपलब्ध झाला. या प्रस्तावनाखंडामध्ये त्यांनी वैदिक वाङ्मयातील वारंवार येणाऱ्या काही प्रमुख संज्ञातील अर्थाच्या विकासक्रमाचा नेटका आढावा घेतला आहे. निरुक्ति व व्युत्पत्तीच्या साहाय्याने वैदिक शब्दाच्या अर्थाचा शोध घेत विनोबा त्याला नव्या कालोचित आशयाचे परिमाण मिळवून देतात. विनोबांचे हे आरंभीचे सर्वच लेखन आर्य पद्धतीचे आहे. मोजक्या, नेमक्या व अर्थघन शब्दांच्याद्वारे सूत्रमय पद्धतीने विनोबा विवेचन करतात. त्यामुळे शब्द थोडे असले तरी ते भरगच्च अर्थामुळे वजनदार झाले आहेत. अल्पाक्षर सूत्र पद्धतीमुळे या पुस्तकांची पृष्ठसंख्या मर्यादित राहिलेली आहे.

परंपरा सूत्राची व्याख्या खालीलप्रमाणे करते :

'अल्पाक्षरं असंदिग्धं सारवत् विश्वतो मुखम्।
आस्तोभनवद्यंच सूत्रो सूत्रविदो विदुः।।'

आपल्या 'गीताई' या अजोड ग्रंथात विनोबा म्हणतात :

गीताई माउली माझी तिचा मी बाळ नेणता।
रडता पडता घेई उचलोनी कडेवरी।।

'मातृहस्तेन भोजनम्।' 'मातृमुखेन शिक्षणम्' अर्थात आईचा हाताने भोजन व आईच्या मुखाने शिक्षण असा विचार विनोबा मांडतात. म्हणून शास्त्रांनी 'मातृकापाठ' असा शब्द मांडला. याचा अर्थ आई बाळाला सुरुवातीचे वर्ण व शब्द शिकवते. त्याला मातृकापाठ म्हटले. नवजात अर्भकाला आईकडूनच ज्ञानाची पहिली दिक्षा मिळते म्हणून आईला पहिला गुरु म्हटले.

पुढचं शिक्षणही मातृहृदयी आचार्यांकडून आईच्या वात्सल्याने व ममतेने मिळाले पाहिजे असे विनोबांना वाटते. शिक्षणाने माणूस आत्मनिर्भर झाला पाहिजे. 'प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत' असे मनुवचन आहे. मुलगा सोळा वर्षांचा झाला की पित्याने त्याच्याशी मित्रासारखे वरोबरीच्या नात्याने वागावे. यातूनच विनोबांनी 'सोळा वर्षापर्यंत स्वावलंबनाचे शिक्षण व सोळा वर्षानंतर स्वावलंबनाने शिक्षण' असे सूत्र सिद्ध केले.

आचार्य शब्दामध्ये 'आ' हा उपसर्ग व 'चर' हा धातू आहे. आचार्य शब्दाचा आचरणाशी अनुबंध आहे. आपण जे शिकवितो त्याचे आचरण करण्याची व करवून घेण्याची हमी शिक्षकाने पत्करली की त्याची आचार्यत्वाकडे वाटचाल सुरु होते. या वाटचालीत हमखास उपयोगी पडणारे पाथेय म्हणून विनोबांनी ज्ञाननिष्ठा, विद्यार्थीनिष्ठा व समाजनिष्ठा हे निष्ठात्रय आवश्यक मानले आहे. या तिन्ही निष्ठांचा समावेश असणारे एकसूत्र विनोबांना अभिप्रेत असलेल्या विद्याविश्वाचे चित्र रेखाटताना त्यांनी तयार केले.

'शिक्षक विद्यार्थी परायण
विद्यार्थी शिक्षक परायण
दोघेही ज्ञानपरायण व
ज्ञान सेवापरायण।'

सर्वामध्येच ज्ञानाची कृतकृत्यता आहे. त्याचे ज्ञान आणि श्रम यांच्यातील द्वैत फिटते, शहरे खेडी यातील कृत्रिम भेद लोपतो.

विनोबा भावे विवेचनाच्या ओघप्त सुभाषिते बोलून जातात. बिंदूमध्ये सिंधु साठवण्याची किमया या सुभाषितात असते.

काही उदाहरणे :

१) सत्याची व्याख्या नाही कारण व्याख्येचाच आधार सत्यावर आहे.

२) स्वधर्म सहज प्राप्त असतो. मुलाला दूध पाजण्याचा धर्म आई मनुस्मृती वाचून शिकत नाही.

३) कर्म सोडणे अशक्य आहे. कारण सोडणे हेही कर्मच आहे.

४) जी वाणी सत्याला सांभाळते, त्या वाणीला सत्य सांभाळतो.

५) पौर्णिमेला कृष्णाचा मुखचंद्र पहावा. अमावस्येला कृष्णाची अंगकांती पहावी.

६) सृष्टि म्हणजे देवाची आरती. पूजा सर्व होवून गेली आहे. आपला नमस्कार तेवढा बाकी आहे.

७) संन्यास ही नोट आहे. कर्मयोग नाणे आहे. किमत एकच.

८) दुःखे सहन करणे हा तितिक्षेचा आरंभ आहे. तितिक्षेची कसोटी सुखे सहन करण्यात आहे.

९) ज्ञानदेव योगी खरे, पण त्यांच्या योगाचा भक्तीला साष्टांग नमस्कार आहे.

संस्कृत भाषेवर विनोबांचे प्रभुत्व होतेच. त्यामुळे काही अनोळखी वैदिक गीर्वाण शब्द, संज्ञा व संकल्पना ते वापरीत. विनोबांचे अनुभवामृत साठवणारे खालील दोन श्लोक उपलब्ध आहेत.

१) कालजारणम् स्नेहसाधनम्।
कटुकवर्जनम् गुणनिवेदनम्।

२) वेद वेदान्त गीतानी विनुना सार उद्धृतः।
ब्रह्म सत्यं जगत्स्फूर्तिः जीवनं सत्य शोधकम्।।

सत्याचा शोध हे जीवन बनलेल्या विनोबांच्या व्यापक दृष्टीस सादर वंदन.

•••

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१